पंढरी संचार

pandharisanchar.com

RNI-MAH-MAR/1499/2000

• पंढरपूर • गुरुवार, २८ नोव्हेंबर २०२४ • किंमत ₹ ४ • पाने : ८ • वर्ष २९ • अंक - १८८

NO PAIDNEWS

शहीद अशोक कामटे संघटनेचे कार्य आदर्शवत - संतोष कणसे PII

अकलूज येथे रयतेचा राजा - राजा शिवछत्रपती महानाट्याची जय्यत तयारी PIII

At a Glance

भाजपला पाठिंब्याची चर्चा खोटी

सांगोला : शेतकरी कामगार पक्षाने कोणाला पाठिंबा द्यायचा याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्याने भाजपच्या पाठिंबाबाबतची चर्चा आहे ती खोटी असून, मला बदनाम करण्याचा कट असल्याचे मत शेकापचे नूतन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले. जर कोणाला पाठिंबा द्यायचा असेल, तर त्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार आमच्या पक्षाचे सरचिटणीस भाई जयंत पाटील यांना आहे. मी पक्षाचा पाईक आहे, पक्ष जो निर्णय घेईल, तो मलाही बंधनकारक असणार आहे, असेही आ. देशमुख म्हणाले.

आवताडे-परिचारकांमध्ये क्लेश सुरूच

पंढरपूर : विधानसभा निवडणुकीनंतर परिचारकांच्या कार्यकर्त्यांनी पंढरपुरात लावलेल्या डिजिटल फलकावर अवताडेंचा फोटो गायब झाला आहे. यामुळे आवताडे परिचारकांमध्ये क्लेश सुरूच असल्याचे दिसून येते आहे. दिवंगत आमदार भारत भालके यांच्या निधनानंतर लागलेल्या विधानसभेच्या पोटनिवडणुकीत परिचारकांना संधी न देता भाजपच्या पक्षश्रेष्ठीने अवताडे यांना संधी दिली. या निवडणुकीत परिचारकांनी पंढरपूरमधून आवताडे यांना मदत केली. याच जोरावर आवताडे निवडणुकीत विजयी झाले. मात्र काही वेळेनंतर अवताडे व परिचारकांचे मतभेद सुरू झाले.

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार ; गुन्हा दाखल

सोलापूर : लग्न करण्याचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार करून लग्नास टाळाटाळ केल्याप्रकरणी पीडित तरुणीने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. ही घटना नोव्हेंबर महिन्यातील 2, 6 व 11 रोजी शहराबाहेरील एका लॉजवर घडल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी महेश उर्फ अवी लोखंडे (राहणार आनंद नगर, होटगी रोड, मजरेवाडी, सोलापूर) असे गुन्हा नोंदलेल्या तरुणाचे नाव आहे. पीडिता शहरातील एका फार्ममध्ये खासगी नोकरी करते. नोकरीनिमित्ताने तिची आरोपीशी ओळख झाली. त्यानंतर तरुणाने तिला आमिष दाखवून प्रेमाच्या जाळ्यात ओढले.

'ट्रॅव्हल्स'च्या दरातच आता चक्क विमानप्रवास

सोलापूर : गोवा येथील फ्लाय 91 विमानसेवेमध्ये एक आनंदाची बातमी समोर आली आहे. कंपनीने 23 डिसेंबरपासून सोलापूर-गोवा आणि सोलापूर-मुंबई या विमान फेऱ्या सुरू करण्याची घोषणा केली आहे. या सेवेचे प्रारंभिक दर ट्रॅव्हल्सच्या दराइतकेच असतील आणि प्रवासाच्या तारखेच्या किमान तीन ते चार महिने अगोदर तिकिटे बुक केल्यास अत्यंत कमी दरात तिकिटे मिळू शकतात. या सेवेमुळे सोलापूरवासीयांसाठी गोवा आणि मुंबईकडे जाणे सोयीचे होईल.

मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी 2 तारखेला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदावर शिक्कामोर्तब झाले असून या पदासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाला पसंती दिली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेही फडणवीस यांच्या नावाला पंसती दिली आहे. याची अधिकृत घोषणा शुक्रवारी होण्याची शक्यता आहे. नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी दोन डिसेंबरला होण्याची शक्यता आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, भाजप कोणत्याही परिस्थितीमध्ये मुख्यमंत्रिपद सोडण्यास तयार नाही. शिंदेंच्या शिवसेनेकडूनही मुख्यमंत्रिपदाचीच मागणी करण्यात येत होती. त्यामुळे महायुतीमधील मुख्यमंत्रिपदाचा पेच वाढतच चालला आहे. भाजपने शिंदेंना मुख्यमंत्रिपदाऐवजी दोन प्रस्ताव दिले होते. शिंदे यांनी हे प्रस्ताव फेटाळून लावल्याचे सांगितले जात होते; परंतु त्यांच्या पत्रकार परिषदेनंतर सर्व वादांना पूर्णविराम मिळाला आहे. येत्या दोन दिवसात मुख्यमंत्री कोण याचा निर्णय होऊ शकतो. ३० नोव्हेंबर किंवा २ डिसेंबरला शपथविधी होईल. या शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह यांच्यासह अनेक मोठे नेते येणार असल्यामुळे या तयारीसाठी हा मधला वेळ घेतला जात आहे.

भाजपकडून शिंदे यांना प्रस्ताव स्वीकारण्यासाठी ७२ तासांचा अल्टिमेटम देण्यात आला होता. त्यांनी दोन प्रस्तावापैकी कोणता स्वीकारला, यावर उद्याच प्रकाश पडू शकेल. उद्या भाजपचे केंद्रीय निरीक्षक येणार होते; परंतु शिंदे यांच्या निर्णयाने आता त्यांचे येणेही औपचारिकताच उरली आहे. » पान ३ वर



महत्त्वाच्या मंत्रिपदासाठी मोर्चेबांधणी

• अजित पवार यांनी ४१ जागा जिंकून शरद पवारांनीच वर्षानुवर्षे मळलेली वाट धरली आहे. मुख्यमंत्रिपदाचे सोडा, जेवढी महत्वाची मंत्रिपदे पदरात पाडता येतील त्यासाठी अजित पवारांनी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. भाजप-शिंदे यांच्या वादात राष्ट्रवादी आपला फायदा करून घेण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

शिंदेनी सोडला मुख्यमंत्रिपदावरचा दावा

दबावतंत्र निरुपयोगी;

देवेंद्र फडणवीसांचा मार्ग अखेर मोकळा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : बिहारसह अन्य राज्यांची उदाहरणे देत मुख्यमंत्रिपदावर एकनाथ शिंदे यांनाच ठेवावे, असा दबाव शिवसेनेच्या शिंदे गटाने आणला; परंतु राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटासह कुणीच त्यांना साथ दिली नाही. उलट, शिंदे गटाचे काही आमदारही देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्यास अनुकूल होते. शिंदे गटाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट मागितली; परंतु ही भेट देण्याऐवजी मोदी यांनीच फडणवीस यांच्या नावाला अनुकुलता दाखवली. त्यामुळे अखेर शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत भाजप जो निर्णय घेईल, त्याच्याशी आपण सहमत असल्याचे सांगत मुख्यमंत्रिपदावरचा दावा सोडला. त्यामुळे आता फडणवीस यांचा मुख्यमंत्री होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

महायुतीच्या नेत्यांची दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत बैठक होणार आहे. या बैठकीसाठी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित पवार आणि भाजपचे महाराष्ट्रातील प्रमुख नेते देवेंद्र फडणवीस उद्या दिल्लीला जाणार आहेत. शाह यांनी शिंदे, पवार आणि फडणवीस यांना दिल्लीत बोलावले आहे. शाह यांच्यासोबत उद्या रात्री या तीनही नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीत मुख्यमंत्रिपदावर कोण बसणार, हा निर्णय घेण्यात येणार आहे. अर्थात ही औपचारिक बैठक आहे. अगोदरच फडणवीस यांचे नाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि मोदी यांनी निश्चित केले आहे. मोदी यांनी त्याबाबत शिंदे यांना फोन करून त्यांच्याशी चर्चा केली. शिंदे यांनीही मोदी यांचा फोन आला होता, असे सांगितले.

शिंदे यांच्या पत्रकार परिषदेआधी शिवसेनेचे काही दिग्गज नेते त्यांच्या ठाणे येथील निवासस्थानी दाखल झाले होते. राज्यात राजकीय भूकंप घडणार असल्याच्या बातम्या माध्यमांनी चालवल्या. शिंदे भाजपच्या सरकारला बाहेरून पाठिंबा देणार असल्याचे सांगितले जात होते; परंतु प्रत्यक्षात तसे काहीही झाले नाही. मुख्यमंत्रिपदासाठी आता फडणवीस यांचे नाव निश्चित झाल्याने दिल्लीतील चर्चेत फक्त पाच वर्ष भाजप आपल्याकडे मुख्यमंत्रिपद ठेवणार की महायुतीमधील इतर दोन पक्षांसोबत मुख्यमंत्रिपद वाटून घेते, यावर निर्णय होण्याची शक्यता आहे.

दोन्हींकडून साकडे

• महाराष्ट्रात शिंदे मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी त्यांच्या समर्थकांनी तर फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत, यासाठी भाजपच्या नेत्यांनी पूजा, अर्चा आदींवर भर दिला होता. चंद्रकांतदादा पाटील यांच्यासारख्या नेत्यांनीही त्यात भाग घेतला; परंतु कौल फक्त फडणवीसांना मिळाला.

फडणवीस सरकारला केंद्र सरकारचे

7 हजार कोटीचे पहिले गिफ्ट

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणूकीत १३२ आमदार जिंकून येऊन सुमारे ८ अन्य निवडून आणलेल्या आमदारांनी भाजपाला पाठिंबा दिला आहे. १४० आमदार भाजपासोबत असल्याने मुख्यमंत्रीपदी भाजपाचे चाणाक्य देवेंद्र फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार हे आता अधोरेखित झाले असले तरी खुर्चीवर बसण्यापूर्वीच दिल्लीतल्या केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या भाजपाला रेल्वे कनेक्टीव्हीटीसाठी ७ हजार ९२३ कोटी रुपये दिले असल्याचे आज रेल्वे मंत्रालयाकडून जाहीर करण्यात आले.

विशेषतः जळगांव, भुसावळ आणि विदर्भातल्या धान उत्पादकांना परराज्यात धान पाठविण्यासाठी तातडीची मदत व्हावी या दृष्टीकोनातून कनेक्टीव्हीटी हे मुख्य साधन गृहीत धरुन ही मदत दिली आहे.

विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या ठिकाणच्या शेतकऱ्यांना आपल्या मालाची योग्य ती बाजारपेठ मिळावी म्हणून ही योजना आखून रेल्वेच्या मार्गातील सुसूत्रीकरण अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने रेल्वे खात्याने हे पाऊल उचलले आहे. केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांच्या पुढाकारानेच ही सूत्रबद्ध यंत्रणा आखली गेली असून याचा परिसरातील व्यापाऱ्यांना तसेच दूरवरच्या प्रवाशांना योग्य त्या सोयी उपलब्ध होतील असेही रेल्वे खात्याकडून सांगण्यात आले.

देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होण्यापूर्वीच केंद्र सरकारने दिलेले हे पहिले गीफ्ट लांबचे प्रवासी आणि धान उत्पादक यांना गरजेची होती त्यामुळेच तातडीने हा निर्णय घेऊन मदतीची घोषणा करण्यात आली आहे.

कुलकर्णी यांची मॅटच्या सदस्यपदी निवड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : पोलिस खात्यातील सेवेत आपल्या विशेष सेवेतून नावलौकीक मिळविलेल्या अतुलचंद्र कुलकर्णी यांची महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (मॅट्च्या) सदस्यपदी (प्रशासकीय) नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची मुदत चार वर्षे राहणार आहे. कुलकर्णी हे मूळचे सोलापूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. ते 1990 च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असून त्यांनी राज्यातील विविध जिल्ह्यात पोलिस अधिकारी पदावर काम केले. दहशतवाद विरोधी पथकात असताना त्यांनी 128 तरुणांचे मन परिवर्तन करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले.

सेनेच्या दोन आमदारांचे फडणवीसांशी गुप्तगुं !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री विराजमान होण्यासाठी देवेंद्र फडणवीस आणि काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात रस्सीखेच चालू असली तरी एकनाथ शिंदे यांनी भाजपच्या केंद्रीय नेत्यांचा शब्द अखेरचा मानून त्याप्रमाणे माझी कार्यवाही होईल असे स्पष्टपणे जाहीर करुन सुद्धा शिवसेनेच्या (शिंदे गट) पहिल्या फळीच्या नेत्यांकडून मुख्यमंत्री पदासाठी आग्रह धरण्याची भूमिका शिंदे यांच्याकडे मांडली असल्याचे अत्यंत विश्वसनीय वृत असून याबाबत पक्षांतर्गत पातळीवर खलबताला उधाण आलेले दिसते.

दरम्यान, आज साडेदहा ते एक च्या दरम्यान शिवसेनेचे व एकनाथ शिंदे यांचे खंद्दे समर्थक असलेले गुलाबराव पाटील व सुहास कांदे या दोन आमदारांनी सागर बगल्यावर जाऊन देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून या भेटीचा तपशील मात्र समजला नसला तरी या दोघांकडून फडणवीस साहेबांचे अभिनंदन करण्यासाठी ही भेट होती असे प्रसार माध्यमांना सांगण्यात आले. परंतु फडणवीस यांची भेट घेऊन सागर बंगल्याच्या बाहेर पडलेल्या या नेत्यांच्या चेहऱ्यावर गंभीरपणा दिसून येत होता. त्यामुळे कुणाशीही न बोलता हे दोघेही आपल्या वाहनात बसून निघून गेल्याने तिथे उपस्थित असलेल्या अनेकांकडून अनेक तर्कवितर्क लढविले जात आहेत. या दोघांच्या भेटीत नेमकी काय चर्चा झाली हे रहस्य मात्र गुलदस्त्यात राहिले आहे.

निष्ठेवर तुरी खिशात भरली नोटांची पुडी !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : सोलापूर जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणूकीत दोन ते तीन मतदार संघात कमालीची चुरस दिसून येत असतानाच माढ्याच्या निवडणूकीने कार्यकर्त्यांच्या फोडाफोडीचा एक उच्चांक समोर येताना दिसत आहे. आणि गाव पातळीवर याबाबतची चर्चाही चहाच्या कॅन्टीनवर, मारुतीच्या देवळासमोर तर चौकातील पारावर होत असताना दिसून आली.

माढ्याची निवडणूक ही अनेक अर्थानी गाजली असली तरी गेल्या ३० वर्षाची राजकारणाची मक्तेदारी मोडून काढण्यात नूतन आमदार अभिजीत पाटील यांना मतदारांनी ठरवून चांगली साथ दिली हे या निवडणूकीचे वैशिष्ट्य मानावे लागेल.

पंढरपूर तालक्यातील ४२ गावांनी आमदार अभिजीत यांच्या पारड्यात भरभरुन मते टाकली. हे दिसत असतानाच दोन-तीन पिढ्या ज्या नेर्तृत्वाच्या छायेखाली अनेक पदे भोगली अशा एका ज्येष्ठ कार्यकर्त्यांने सुमारे ५० लाख रुपयाचे घबाड » पान ३ वर

भाजपकडून महापालिका निवडणुकीची तयारी सुरू

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले आहे. यामुळे आता तीन महिन्यातच महापालिका निवडणुका होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर भाजपने राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षांची बैठक मुंबई येथे घेऊन निवडणुकीबाबत सूचना दिल्या आहेत. यामुळे भाजपने महापालिका निवडणुकीची तयारी सुरू केली असल्याचे दिसून येत आहे. गेल्या तीन वर्षापासून महापालिका निवडणुका रखडल्या आहेत. यामुळे या निवडणुका केव्हा होणार

याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. विधानसभा निवडणुकीत महायुतीला चांगले यश मिळाले आहे. यामुळे आगामी महापालिका निवडणुकीकडे भाजपने लक्ष केंद्रित केले आहे. विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी संपली » पान ३ वर

महाराष्ट्र टाइम्स - सूडाचा रक्तरंजित वारसा ! ★★★

Pune Mirror - A complete entertainment package

अल्ट्रा मराठी बज - जबरदस्त ॲक्शन आणि श्वास रोखणारा थरार !

लोकमत फिल्मी - बॉलीवूड स्टाईल जबरदस्त चित्रपट

मराठी मनोरंजन विश्व - बॉलिवूड आणि साऊथ सिनेमाला टक्कर देणारा 'मराठी ॲक्शनपट' ★★★★

प्लॅनेट मराठी - सूड, मैत्री, सत्ता, विश्वासघाताचा रक्तरंजित प्रवास 'रानटी' ★★★

लोकमत - टाळ्या, शिट्ट्या आणि पैसा वसूल 'रानटी' चित्रपट ★★★

नवराष्ट्र - कला, दिग्दर्शन , लेखन, संगीत, पार्श्वसंगीत, साहसी दृश्ये यांचा उत्तम मेळ

CityPride : सिटिप्राईड : मंगला ७.३०; सिटीप्राईड सातारा रोड रा. ८.००; कोथरुड २.००, १०.००; आर डेक्कन ७.१५; रॉयल पिंपळे सौदागर रा. १०.००

Cinépolis : सिझन मॉल ४.३०, ९.००, १०.००; वेस्ट एन्ड औंध १.३०, ८.१५;

PVR INOX : पिव्हीआर/आयनॉक्स सिनेमाज : मार्केटसिटी पुणे २.२०, ८.३५, १०.४५; पॅव्हेलियन १२.१५, ५.४५; ग्रँड हायस्ट्रीट हिंजवडी २.००, ८.०५; डीसी कोपा १२.००, ५.१०; कुमार पॅसिफीक पुणे १.३०, ७.५०; बंड गार्डन पुणे ३.४५, १०.१५; जयगणेश पिंपरी ९.३०, ३.५०, १०.१०; रॉयल हेरीटेज मॉल पुणे ९.३५, ३.४५, १०.३०; पीएमसी वाकड १.२०, ४.२०, ७.४०, १०.४०, एल्प्रो चिंचवड १२.४०, ७.००;

Abhiruchi CityPride : अभिरुची सिटीप्राईड सिंहगड रोड २.१५, १०.००

फनटाईम सिंहगड रोड १२.३०, ३.००, १०.३०

फनटाईम पिंपरी १२.३०, ३.००, १०.३०

राहुल पुणे १.००, १०.३०

E-SQUARE ENTERTAINMENT ETC : बॉलीवुड खराडी रा. ८.४५, इलाईट झॉन हिंजवडी ४.००

वैभव हडपसर १.१५, ९.४५

राजहंस फातिमानगर १२.००,७.००

अशोक पिंपरी ३.३०

विशाल पिंपरी १.३०, १०.३०

फनकेअर गोतावडे फाटा ७.००

तारा बारामती १.००, ९.:३०

MIRAJ : स्पाईन मॉल भोसरी १२.४५, १०.००

MOVIE MAX : अमानोरा ४.३०, ८.४५; मारीप्लेक्स ४.००

विलक्स खडकी ६.३०

वसंत सिनेप्रो १२.३०, १०.००

राहुल इंदापूर १२.००

सुभद्रा बारामती ३.१५, ९.००; शिवाजी तळेगाव; स्वामी समर्थ जेजुरी १२.००, ९.००; नवनाथ वणेवाडी १२.००, ९.००; डिजी गोल्ड नोवा शिरुर ६.३०; शेवंता जुन्नर ३.००, ६.००; आशिष निरा १२.००, ६.००; सत्यम राजगुरुनगर ३.००, ६.००; गुंजन शिखरापूर १.००, ७.००; गुंजन कारेगाव ३.००, ६.००; गुंजन न्हावरे ३.००, ९.००; लक्ष्मी नारायणगाव ३.००; सिनेब्लिज नीलकमळ लोणावळा ३.३०

मुख्यमंत्री शिंदे यांचा पवित्रा; मुख्यमंत्रिपदाबाबत अडथळा आणणार नाही

मी समाधानी, रडणार नाही, लढणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

ठाणे : लाडक्या बहिणींचा लाडका सख्खा भाऊ म्हणून माझी ओळख निर्माण झाली. ही ओळख सर्व पदापेक्षा मोठी वाटते. मी समाधानी आहे. नाराज होऊन रडणार नाही. लढून काम करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

मी लोकप्रियता मिळवण्यासाठी काम केले नाही. मी महाराष्ट्राच्या जनतेसाठी काम केले. अडीच वर्षाच्या काळात केंद्र सरकार आमच्या मागे उभे राहिले. मला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा फोन आला होता. मी त्यांना सांगितले, की माझ्यामुळे कोणतीही अडचण होणार नाही. तुम्ही जो निर्णय घ्याल, तो निर्णय आम्हाला मान्य असेल, असे ते म्हणाले. महायुतीला अतिशय मोठा विजय मिळाला आहे. महाविकास आघाडीने थांबवलेली कामे आम्ही पुढे नेली आहेत. विकास आणि कल्याणकारी योजनांची सांगड आम्ही घातली आहे. त्यामुळे आम्हाला मोठा विजय मिळाला. हा जनतेचा विजय असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

• 'वयोश्री योजना सुरू आहे. लाडक्या भावांना रोजगार मिळू लागला आहे. गेल्या अडीच वर्षात जनतेचे प्रेम मिळाले. त्यांना वाटते. आपल्या परिवारातील किंवा घरातील मुख्यमंत्री आहे. मी प्रत्येकाला भेटलो. आज तुम्हीच लोकप्रियतेचे अंदाज काढले आहेत. महाराष्ट्रातील जनतेला काय मिळेल हे पाहून आम्ही काम केले.

-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

मी साधा कार्यकर्ता म्हणून काम करतो. मी मुख्यमंत्री म्हणून स्वतःला कधीच समजले नाही. मी 'कॉमन मॅन' म्हणून वागलो असल्याचे सांगून ते म्हणाले, की मी गरीब परिवारातून आलो. त्यामुळे मला सगळ्या वेदना समजत होत्या. लाडक्या बहिणींसाठी, लाडक्या शेतकऱ्यांसाठी योजना सुरू केल्या. सरकार म्हणून सर्वसामान्य लोकांना आधार हवा असतो, तो आम्ही दिला. आम्ही बाळासाहेब ठाकरे आणि आनंद दिघे यांचे विचार घेऊन पुढे गेलो. अमित शाह हे अडीच वर्ष पूर्ण ताकदीने मागे उभे राहिले. ज्याचा प्रगतीचा वेग वाढला. आम्ही घेतलेले निर्णय ऐतिहासिक आहेत. शेतकऱ्यांचे, सिंचनांचे निर्णय घेतले. राज्य एक नंबरला नेण्याचे काम आम्ही केले आहे. सहा महिन्यात आम्ही पहिल्या नंबरला आलो. मतांचा वर्षाव आमच्या कामामुळे झाला आहे.

पंढरी संचार

सोलापूर : सोलापूर तालुका, पोलीस ठाणे सोलापूर ग्रामीण कडुन नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की त्यांनी पोलीस ठाण्यातील बेवारस अवस्थेत पडलेल्या चारचाकी व दुचाकी वाहनांची ओळख पटवावी. ज्या चारचाकी व दुचाकी वाहनांचा मालकी हक्क कोणही सांगितला नाही अशी एकूण 4 चारचाकी वाहने व 67 दुचाकी वाहने सोलापूर तालुका, पोलीस ठाणेस बऱ्याच कालावधी पासुन पडुन आहेत. चारचाकी वाहना मध्ये एक राखाडी रंगाची स्विफ्ट डिझायर, तीन मालट्रक त्याला बॉडी नसलेली, एक टाटा कंपनीची बारा टायर असलेला मालट्रक व पिवळया रंगाचा जे. सी. बी. अशी आहेत.

शहीद दिनानिमित्त रक्तदान शिबिर; 129 रक्तदात्यांचे उत्स्फूर्तपणे रक्तदान

शहीद अशोक कामटे संघटनेचे कार्य आदर्शवत - संतोष कणसे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सांगोला : सांगोला शहरात सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या शहीद अशोक कामटे संघटनेतर्फे शहीद दिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरामध्ये 129 रक्तदात्यांनी रक्तदान करून शहिदांना आदरांजली अर्पण केली. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन सांगोल्याचे तहसीलदार संतोष कणसे यांच्या प्रमुख उपस्थितीत व नेत्ररोग तज्ञ डॉ.किर्तीकुमार शिंदे, पोलिस निरीक्षक भिमराव खणदाले, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. पी बी गव्हाणे , मा. नगराध्यक्ष नवनाथ पवार ,गिरिशभाऊ नष्टे, मा.नगरसेवक आनंदभाऊ माने , गजानन बनकर ,विलास पाटील सर, नवनाथ शिंदे सर, डीसीसीचे चव्हान, एचडीफसी बँकेचे महेंद्र कांबळे साहेब,माधव शिंदे सर,तसेच दादासो खडतरे, रमेश फुले,उत्तम काका चौगुले,आदर्श शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती कौशल्यादेवी शिंदे मॅडम, माजी उपनगराध्यक्षा सुप्रिया बेले,आशाताई सलगर, शालन शिंदे, प्रमिला जगदाळे अरविंदनाना केदार , मुख्याध्यापक रमेश पवार सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. सुरुवातीस भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व शहिदांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी सांगोला तालुका माजी सैनिक कल्याणकारी संघटनेचे सर्व सदस्य उपस्थित होते. या सर्व सदस्यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक करून संघटनेला भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच यावेळी मनोगत व्यक्त करताना तहसीलदार कणसे साहेब यांनी संघटनेच्या स्थापनेपासूनच्या कार्याचा उल्लेख करत संघटनेच्या कार्याचे कौतुक केले तसेच संघटनेने सलग सोळा वर्षे राबवलेल्या या रक्तदान शिबिराचे देखील आवर्जून उल्लेख केला व संघटना वेळोवेळी नागरी समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेत असते त्याचा देखील आवर्जून उल्लेख केला. यामध्ये प्रामुख्याने रेल्वे संबंधीच्या समस्या सोडण्यासाठी संघटनेने घेतलेली आक्रमक भूमिका तसेच सांगोला परिसरामध्ये नागरिकांना नगरपालिकेच्या संबंधित येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी संघटनेचे असलेली भूमिका या भूमिकांचं स्वागत करत संघटनेच्या कार्याचा गौरव केला व संघटनेचे कार्य खरोखरच इतर सामाजिक संघटनांसाठी एक आदर्शवत कार्य असल्याचे मत यावेळी व्यक्त केले. सकाळी नऊ ते सायंकाळी पाच वाजेपर्यंत या रक्तदान शिबिरामध्ये विविध मान्यवरांनी भेट देऊन संघटनेच्या या कार्यासाठी डॉ. निकिता बाबासाहेब देशमुख, उद्योगपती रमेश फुले, ॲड. विजयसिंह चव्हाण, संगोला नगरपालिकेच्या नगरसेविका अनुराधा खडतरे, राजलक्ष्मी शिंदे, शिवांजली शिंदे , माजी नगरसेवक किशोर बनसोडे, दीपकराव बनसोडे, मुकुंद हजारे, मयुर ढोले, शारिक तांबोळी, विशाल नलवडे, तेजस कुरकुटे,गणेश पाटोळे, हे मान्यवर उपस्थित होते. सायंकाळी पाच वाजता कार्यक्रमाची सांगता शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली यावेळी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नीलकंठ शिंदे, आभार प्रदर्शन चारूदत्त खडतारे यांनी मानले, सूत्रसंचालन प्रसाद खडतरे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी विठ्ठलपंत शिंदे सर,मकरंद पाटील,तोसिफ शेख, सुयोग बनसोडे, अतुल बनसोडे सह संघटनेच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

तोंडानं विष काढताना चक्कर येऊन पडला

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : सोलापुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. ऊस तोडीच्या निमित्ताने फडात काम करताना अचानक एकाला सापाने दंश केला. सापाचं हे विष चढू नये म्हणून दुसऱ्यानं तोंडाद्वारे विष बाहेर फेकण्याचा प्रयत्न करताना तो चक्कर येऊन फडातच कोसळला. किणी (ता. अक्कलकोट) येथे आगरखेडे यांच्या शेतातील फडात ही घटना घडली आहे. रामसिंग ढाकूलाल चतूर (वय ३२), करण रामसिंग जावरकर (वय ३०, रा. पानखल्या, ता. धरणी, जि. अमरावती) अशी या दोघांची नावे आहेत. सध्या ऊसतोडीचे दिवस असल्याने गावोगावी कारखान्यामार्फत ऊसतोडीची टोळी फडामध्ये आहे.

Selected

लोकप्रतिनिधी अधिनियम कायद्याने व्हेरिफिकेशनचे आदेश

बार्शी : बार्शी मतदार संघातून महाराष्ट्र विधानसभा निवडणुकी करिता बार्शीचे माजी आमदार तथा उमेदवार राजेंद्र विठ्ठल राऊत यांनी निवडणूक आयोगाकडे नामनिर्देशन पत्रासोबत दाखल केलेले शपथबद्ध शपथपत्रांमध्ये बनावटीची व दिशाभूल करणारी माहिती दिल्याने तसेच अनेक माहिती लपवल्यामुळे लोकप्रतिनिधित्व अधिनियम 1951 आणि 1950 मधील कलम 125 अ याचा भंग केल्याप्रकरणी त्यांचा निवडणूक अर्ज अपात्र करण्यात यावा अशी तक्रार निवडणूक निर्णय अधिकारी, बार्शी यांच्याकडे दाखल करण्यात आली होती.

चाकूचा धाक दाखवून व्यवसायिकाला लुटले; ६५ हजाराची लूट

माढा : मोडनिंब येथील पालखी मार्गावरील रेल्वे ब्रिजखाली रात्रीच्या सुमारास एका व्यवसायिकाला लुटल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. दोन चोरट्यांनी डोळ्यात चटणी टाकून चाकूचा धाक दाखवत तीन सोन्याच्या अंगठ्या, सोन्याची चेन, चांदीची अंगठी असा ६५ हजाराचा ऐवज चोरट्यांनी लुटून नेला. याबाबत अधिक माहिती अशी, मोडनिंब (ता. माढा) येथील सचिन संजय जाधव (वय २४) हा व्यवसायिक दुकान बंद करून मोटारसायकलवरून घराकडे निघाला होता. याला दबा धरून बसलेल्या चोरट्याने डोळ्यात चटणी टाकून लुटल्याची घटना घडली आहे.

जिल्हा कारागृह येथे संविधान दिन उत्साहात साजरा

सोलापूर : प्रमुख जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर, जिल्हा कारागृह, सोलापूर तसेच लाईफ लाईन वेल्फेअर सोसायटी सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने, आज जिल्हा कारागृह सोलापूर येथे संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश सलमान आझमी यांच्या हस्ते संविधान उद्देशिकेच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तसेच उदर्शिकेचे सामुहिक वाचन करण्यात आले.

आई व 4 वर्षाची चिमुकली जागीच ठार

सोलापूर : आठवडा बाजार करून व चिमुकलीला शाळेचा ड्रेस घेऊन घराकडे निघालेल्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने आई व पाच वर्षीय चिमुकली जागीच ठार झाल्याची घटना मंगळवेढा-उमदी रोडवरील सोड्डी फाट्याजवळ आज दुपारी 3 च्या सुमारास घडली आहे. हा अपघात इतका विचित्र होता की आईच्या शरीराचे तुकडे पडले आहेत, तर पाच वर्षीय मुलीला जोराचा मार लागल्याने तिचाही मृत्यू झाला आहे. शांता धनाजी बाबर (वय 25 रा. खवे ता. मंगळवेढा) व त्यांची अनन्या बाबर (वय 4) चिमुकली असे अपघातात मयत झालेल्या दोघांची नावे आहेत.

मार्गदर्शन....

पंढरी संचार छायाचित्र सेवा

माळशिरस : मनशक्ती प्रयोग केंद्र लोणावळा यांच्यामार्फत विद्यार्थ्यांसाठी मनशक्ती शिबिराचे आयोजन श्रीराम इंग्लिश स्कूल ,पानीव या ठिकाणी करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थी यांना मार्गदर्शन करताना मनशक्ती केंद्र लोणावळ्याच्या सौ.जंगले मॅडम.

श्रीराम इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांसाठी 'मनशक्ती' शिबिराचे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माळशिरस : दिनांक 26 नोव्हेंबर, 2024 रोजी मनशक्ती प्रयोग केंद्र लोणावळा यांच्यामार्फत विद्यार्थ्यांसाठी मनशक्ती शिबिराचे आयोजन श्रीराम इंग्लिश स्कूल ,पानीव या ठिकाणी करण्यात आले मनशक्ती केंद्र लोणावळ्याच्या प्रतिनिधी सौ जंगले मॅडम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी प्रायोगिक, प्रात्यक्षिक तसेच स्पष्टीकरण पद्धतीने मनशक्ती मुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात सर्वांगीण विकास घडून येणे ,बौद्धिक क्षमता वाढणे ,स्मरणशक्ती वाढी बरोबरच प्रेरित ऊर्जा निर्माण होते, विद्यार्थ्यांनी नेहमी सृजनशील विचार जोपासले पाहिजेत असे मत व्यक्त केले केले. यावेळी मनशक्ती वर आधारित पुस्तक प्रदर्शन ही भरवण्यात आले. त्यातून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढीस लागला.

सदर कार्यक्रमास श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (बापू)पाटील, मार्गदर्शक आदरणीय सौ. श्रीलेखा(Maa) पाटील ,सचिव (adv.)

मा .श्री. अभिषेक (भैय्या) पाटील, उपाध्यक्ष मा. श्री. करण (भैय्या) पाटील, सहसचिव माननीय डॉ. समीर पवार, विशेष कार्यकारी अधिकारी दिनेश (आप्पा)शिंदे, भाऊसो वनवे , विनोद बाबर ,प्रमोद झगडे, स्कूलच्या प्राचार्या रेणुका जावळे तसेच शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

श्रीराम महाविद्यालयात "संविधान दिन" उत्साहात साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माळशिरस : दि. २६ नोव्हेंबर २०२४ रोजी श्रीराम शिक्षण संस्था संचलित ,श्रीराम विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय व कै. राजेंद्र शामराव पाटील विद्यालय पानीव या महाविद्यालयामध्ये संविधान दिन साजरा करण्यात आला.२६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाच्या संविधान सभेने राज्यघटना स्वीकारली. हा तो दिवस आहे, जेव्हा संविधान तयार झाले. जगातील सर्वात मोठी लोकशाही जन्माला आली. संविधान दिनालाच राष्ट्रीय विधी दिन असेही म्हणतात.

" न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुता मूल्यातून या देश महान
देशच आहे धर्म आमचा
धर्मग्रंथ आणि संविधान "

यावेळी भारतीय संविधान बाबत सर्वसाधारण माहिती तसेच भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क, कर्तव्ये, निर्मिती, निर्मिती समिती,अनुच्छेद, विशेषता यावर प्रा.श्री.संतोष बोडके सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयातील चैत्राली कुंभार, द्विवेदी गुरव, रोहन कुंभार या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानावर आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.श्री. सुभाष घुले सर यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे विभागप्रमुख व इतर सर्व शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

माळशिरस वकील संघटनेमार्फत संविधान दिन साजरा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

माळशिरस : भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त माळशिरस वकिल संघटनेच्या वतीने माळशिरस न्यायालयातील वकील संघाच्या कार्यालयामध्ये मोठ्या उत्साहात संविधान दिन साजरा करण्यात आला.

यावेळी वकील संघटनेच्या अध्यक्षा ॲड.मोहिनी देव, उपाध्यक्ष ॲड.राहुल लवटे,ज्येष्ठ विधिन्य ॲड.माधव मिराजदार, ॲड.एस.बी.पाटील,ॲड.डी.एन. काळे,ॲड. आर.एस.वाघमोडे, ॲड.जी.पी.कदम आदी मान्यवरांच्या शुभहस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व भारतीय संविधानाच्या प्रतीचे पूजन करण्यात आले व सामुदायिक संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना ॲड.सुयश सावंत व ॲड.वैभव धाईंजे यांनी संविधानाचे मूल्य,जोपासना व संविधानाच्या साक्षरतेच्या गरजेचे आहे वरती भाष्य करून वक्तृत्व सदर केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक ॲड.भारत गोरवे यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड.सुमित सावंत यांनी केले.या कार्यक्रमास माळशिरस वकील संघटनेचे वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ॲड.धनंजय बाबर,ॲड.भारत गोरवे ॲड. सुमित सावंत,ॲड.अभिषेक चंदनशिवे,ॲड.वैशाली कांबळे, ॲड.मनोज धाईंजे यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर : सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानातंर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी https: //mahadbtmahait. gov. in या संकेतस्थळावर अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. या अभियान कार्यक्रम अंतर्गत सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी सोलापूर जिल्हयास अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रक्कम रु. 130. 05 लाख कार्यक्रम राबविण्यास मान्यता मिळाली आहे. अधिक माहितीसाठी संबधीत नजीकच्या कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा.

दि. ०२ व ०३ डिसेंबर २०२४ रोजी होणाऱ्या

अकलूज येथे रयतेचा राजा - राजा शिवछत्रपती महानाट्याची जय्यत तयारी

■ पंढरीसंचार न्यूज नेटवर्क

माळशिरस : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षपूर्ती सोहळ्यानिमित्त दिनांक ०२ व ०३ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या रयतेचा राजा - राजा शिवछत्रपती या महानाट्याच्या 125 बाय 70 फुटाच्या भव्य व्यासपिठाचे व नटराज मुर्तीचे पूजन सयाजीराजे मोहिते पाटील यांचे हस्ते झाले. व महानाट्याच्या सरावास प्रारंभ झाला. शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील यांनी सरावा वेळी भेट देवून आवश्यक त्या सूचनाही केल्या. सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती अकलूज, शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार वर्ग यांचे वतीने विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकूल, अकलूज येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.

या महानाट्यात छत्रपती चित्रपट कलावंत शंतनू मोघे, अभिनेत्री पल्लवी वैद्य, रवींद्र कुलकर्णी, अभिनेते विश्वजीत फडते यांच्यासह स्थानिक ९०० हून अधिक कलाकारांचा समावेश आहे. याचे लेखक युवराज पाटील, दिग्दर्शक अजय तपकिरे व सूत्रधार डॉ. विश्वनाथ आवड आहेत.

यात घोडे, बैलगाड्या, पायदळ, मावळे दिसणार आहेत. या महानाट्यात शिव जन्मापासून ते शिवराज्याभिषेक सोहळ्यापर्यंतच्या ऐतिहासिक घटनांचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या सहकार्यांच्या शौर्याची गाथा उलगडणार आहे. या दोन दिवसांच्या महानाट्यासाठी सुमारे एक लाखहून अधिक रसिक प्रेक्षक उपस्थित राहणार आहेत.

सहकार महर्षी साखर कारखान्याचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संग्रामसिंह मोहिते- पाटील, कु. स्वरुपाराणी मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली विविध कमिट्या कार्यरत असून क्रीडा संकुल येथे याची जय्यत तयारी सुरु आहे. यावेळी सचिव अभिजीत रणवरे, सहसचिव हर्षवर्धन खराडे-पाटील उपस्थित होते.

फेर निवडणूक घेण्यासाठी याचिका दाखल करणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाची निवडणूक धार्मिक मुद्द्यावर झाली. मी धर्म बदलल्याचा अपप्रचारही झाला. सोशल मीडियावरील काही पोस्टचा आधार घेऊन उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे. शहर मध्यची निवडणूक रद्द करून फेर निवडणूक घेण्यासंदर्भात याचिका दाखल करणार असल्याची माहिती माजी आमदार नरसय्या आडम मास्तर यांनी पत्रकार परिषदेत दिली. वय आणि प्रकृतीचा विचार करता यापुढे मी निवडणूक लढवणार नाही, असेही ते म्हणाले. या निवडणुकीत आडम यांचा भाजपचे उमेदवार देवेंद्र कोठे यांनी पराभव केला आहे.

» पान १ वरुन

मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी २ तारखेला

शिवसेनेकडून उपमुख्यमंत्रिपदासाठी डॉ. श्रीकांत शिंदे यांचही नाव चर्चेत आले आहे. दरम्यान, मुख्यमंत्री कोण होणार, या चर्चेला लवकरच उत्तर मिळेल. यावर तिन्ही पक्ष मिळून निर्णय घेतील, आमच्या श्रेष्ठींशी सर्वांशी चर्चा सुरू आहेत लवकरच आपल्याला उत्तर मिळेल, असे फडणवीस यांनी सांगितले.

निष्ठेवर तुरी खिशात भरली नोटांची पुडी !

घेऊन आपले खिसे भरले आणि नेत्यांच्या, त्यांच्या पुतण्यांच्या निष्ठेला लाथ मारुन स्वतःचा स्वार्थ साधून घेतला अशी चर्चा आज पुळूज, सुस्ते, तुंगत या परिसरात शेतकऱ्यांकडून होताना दिसून येत होती.इतकेच नव्हे निष्ठेला लाथ मारणाऱ्या बदफैली ग्रामीण भागातील ज्येष्ठ नेत्यांनी माजी आमदार बबनदादा शिंदे यांच्या कारखान्याकडून केलेली उचलही बोळा मारुन घेतली अशीही चर्चा जाणकार कार्यकर्ते व तरुणात होताना दिसते. निष्ठेला पायदळी तुडविणाऱ्या नेत्यांना अनेक संधी प्राप्त करुन दिल्या, वडिलांना सांभाळले त्यांना जवळ करुन अनेक पदं दिली, निष्ठावान म्हणून या कार्यकर्त्यालाही सत्तेची अनेक पद देवून सुद्धा निष्ठेला लाथ मारणारी वृती हे नेत्यांच्याबाबत केलेली गद्दारी याची चर्चा आज संध्याकाळपर्यंत वरिष्ठ कार्यकर्त्यात होताना दिसत होती. पंढरी संचार ने याबाबत खातरजमा करण्यासाठी, चर्चेचा सूर जाणून घेण्यासाठी मुद्दाम एक प्रतिनिधी पाठवून गावातील बारक्या कॅन्टीनवर या चर्चेचा सूर गवसतो याची खात्री करुन घेतली आणि गद्दार तरुण पुढाऱ्याचे पितळ कसे उघडे पाडले याचीही खातरजमा करुन घेतली. ज्यांनी वर्षानुवर्ष प्रामाणिकपणे आपल्यावर प्रेम केले त्यांच्याशी गद्दारी करुन खिसे भरणाऱ्या नेत्यांची चर्चा दबक्या आवाजात होताना दिसत होती.

भाजपकडून महापालिका निवडणुकीची...

आहे. यामुळे येत्या तीन महिन्यात महापालिका निवडणुकीची घोषणा निवडणूक आयोगाकडून होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर भाजपने निवडणुकीची तयारी सुरू केली असून मुंबई येथे राज्यातील सर्व जिल्हाध्यक्षांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत आगामी महापालिका निवडणुकीबाबत सूचना करण्यात आल्या आहेत महापालिकेवर महायुतीची सत्ता आणण्यासाठी भाजपकडून प्रयत्न करण्यात येत आहेत

सोलापूर महापालिका 23 हजार मिळकतदारांना देणार नोटीस

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : सोलापूर महानगरपालिका प्रशासनाने थकीत मिळकतकर वसुलीसाठी कंबर कसली आहे. हा कर प्रभावीपणे वसूल होण्यासाठी 14 डिसेंबर रोजी लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासाठी नोटिसा देण्याचे काम सुरू झाल्याची माहिती महापालिका कर संकलन व आकारणी विभागाचे अधीक्षक युवराज गाडेकर यांनी दिली. महापालिकेचा मिळकतकर मोठ्या प्रमाणात थकीत आहे. 25 हजारांपेक्षा जास्त कर थकीत ठेवणाऱ्या सुमारे 23 हजार मिळकतदारांना लोक अदालितीच्या नोटिसा देण्याचे काम प्रशासनाकडून सुरू करण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

दर्शन....

पंढरी संचार छायाचित्र सेवा

सोलापूर : विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीचे विजयी उमेदवार देवेंद्र कोठे यांनी सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धरामेश्वर मंदिरात सिद्धेश्वरांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिरातील मानकरी हिरेहब्बू पुजारी यांनी सिद्धरामेश्वरांचा प्रसाद देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी भाजपचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

Selected

शामराव कुंडलिक झंजे यांचे दुःखद निधन

माळशिरस: मेडद (ता. माळशिरस) येथील शामराव कुंडलिक झंजे (वय ४८ वर्ष) यांचे २७/११/२०२४ रोजी पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले .त्यांच्या पाश्चात आई ,वडील ,पत्नी , दोन बहिणी ,चार मुली, एक मुलगा,एक जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने परिसरात व गावात हळहळ व्यक्त होत आहे .त्यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

अखेर 'त्या' मृतदेहाची ओळख पटली

सोलापूर : दोन दिवसांपूर्वी खून केलेल्याचे प्रेत गाताची वाडी हद्दीत सापडल्यावर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली अन् तपासाअंती त्या मृतदेहाची ओळख पडली. रोशन शंकर पवार (वय १९, रा. पालघर, कोकण) असे खून झालेल्या युवकाचे नाव आहे. अज्ञात कारणावरून कोणीतरी त्याचा खून केला आणि ओळख पटू नये म्हणून मृतदेह गाताची वाडी हद्दीत टाकून दिला. शोध मृत युवकाकडे असलेल्या मोबाइलमध्ये सीमकार्ड नव्हते. त्यामुळे सायबर क्राइमची मदत घेण्यात आली. त्या मोबाइलमध्ये दुसरे सीमकार्ड टाकून पाहिले असता तो युवक पालघरचा असल्याचे निष्पन्न झाले.

चुलीवर फोडणी पडली महागात, विवाहिता भाजली

सोलापूर : चुलीवर भाजीला फोडणी देताना अचानक भडका उडाल्याने एक विवाहिता गंभीररीत्या भाजली. सोमवारी सायंकाळी पावणेसातच्या सुमारास मंगळवेढा शहरात ही घटना घडली. पूनम धीरज मिनेकर (वय २४, रा. साठेनगर, मंगळवेढा) असे या विवाहितेचे नाव आहे. यातील विवाहिता सोमवारी सायंकाळी घरामध्ये भाजीला फोडणी देताना अचानक भडका उडाला. यामुळे साडी पेटली गेली. यात महिलेच्या सर्वांगास पेट घेतल्याने ती गंभीररीत्या भाजली. तिच्यावर उपचार सुरू असून, शुद्धीवर असल्याचे सांगण्यात आले. सिव्हिल पोलिस चौकीत या घटनेची नोंद झाली आहे.

पाहिजे

हॉस्पिटल मध्ये स्टाफ आणि मावशी

शिक्षण:- ANM \ GNM \ १२ वी पास

पत्ता:- कोडलकर हॉस्पिटल

लिंक रोड,पंढरपूर

फोन नंबर :- ८२९१३१५०८९

विवाहितेचा छळ करणाऱ्या सहा जणांविरुद्ध गुन्हा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सोलापूर : विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ व मारहाण करून छळ केल्याप्रकरणी पती सह पाच जणांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. याप्रकरणी लक्ष्मी गंगाराम गायकवाड वय 24 राहणार सुशील मराठी विद्यालय समोर लिमयेवाडी सोलापूर यांनी फिर्याद दिली आहे. 14 जून ते 14 ऑक्टोबर 2024 या कालावधीत हा प्रकार घडला. गंगाराम गायकवाड (पती), पार्वती गायकवाड (सासू), राजू गायकवाड (दीर), पुष्पा जाधव (नणंद) भीमा गायकवाड (चुलत दीर) सर्व रा.संगमेश्वर नगर, अक्कलकोट रोड अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

आमदार मोहिते पाटील यांना बडतर्फ करा : चेतनसिंह केदार सावंत

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



माळशिरस : विधान परिषदेचे सदस्य रणजितसिंह मोहिते पाटील यांना भारतीय जनता पार्टी पक्षातून तात्काळ बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी सोलापूर जिल्हा पश्चिमचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पत्र देऊन मागणी करण्यात आली.

रणजितसिंह मोहिते पाटील हे भारतीय जनता पार्टीने विधान परिषद सदस्य केले होते परंतु विधानसभा निवडणूक 2024 या निवडणुकीमध्ये माळशिरस विधानसभेचे महायुतीचे उमेदवार राम सातपुते यांच्या विरोधात प्रचार करून कार्यकर्ते व मतदारांना महायुती मधील भाजपच्या अधिकृत उमेदवाराच्या विरोधात मतदान करण्यास प्रोत्साहित केलेला आहे म्हणून रणजितसिंह मोहिते पाटील यांना पक्षातून बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे करण्यात आली.

कल्याणशेट्टी अन् तानवडेंच्या भागात कमळाला लीड

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

अक्कलकोट : चपळगाव गटात ज्या ज्या वेळी कल्याणशेट्टी कुटुंबातील व्यक्ती निवडणूक रिंगणात असते, त्या त्या वेळी त्यांना मतदारांनी साथ दिलेले आहे. हे या निवडणुकीत पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. चपळगाव गटात लोकसभा निवडणुकीत अडीच हजारांचे काँग्रेस पक्षाला लीड गेले होते. याच गटात यंदा ३८७० मताचे भाजपला लीड मिळाले आहे. तसेच वागदरी गटात लोकसभेला केवळ एक हजार मताचे मताधिक्य भाजपला मिळाले होते. यंदा ४, १४१ मताचे लीड भाजपला मिळाले आहे. निवडणुकीच्या तोंडावर कल्याणशेट्टी व तानवडे कुटुंबाच्या मनोमिलनाचा फायदा भाजपला झाला.

आमदार बाबासाहेब देशमुख 25 हजार झाडे लावणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

सांगोला : सांगोला विधानसभा मतदार संघातून शेकापचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख हे 25 हजार 386 मताचे मताधिक्य घेऊन विजयी झाले आहेत. यामुळे आमदार बाबासाहेब देशमुख यांनी मतदार संघात जेवढे मताचे मताधिक्य मिळाले तेवढीच म्हणजे पंचवीस हजार झाडे मतदार संघात लावण्याचा संकल्प केला आहे . सांगोला विधानसभा मतदार संघातून शेकापने डॉ. बाबासाहेब देशमुख यांना उमेदवारी दिली होती तर महायुती शिवसेना शिंदे गटाने आमदार शहाजी बापू पाटील यांना उमेदवारी दिली होती. या निवडणुकीत दुरंगी लढत झाली. यात शेकापचे उमेदवार डॉ. बाबासाहेब देशमुख विजयी झाले. विजयी झाल्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले, सध्या पर्यावरणाचे संतुलन बिघडले आहे. यामुळे झाडे लावणे काळाची गरज आहे. यामुळे आपण 25 हजार 386 मतांनी विजयी झालो आहोत. यामुळे सांगोला विधानसभा मतदार संघात 25 हजार 386 झाडे लावण्याचे नियोजन करण्यास सुरुवात केली आहे. आमदारकीची शपथविधी झाल्यानंतर आपण या कामास सुरुवात करणार असल्याचे त्यांनी सांगितले. नूतन आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या या संकल्पनेचे जिल्ह्यातून कौतुक होत आहे.

रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद; ५०० जणांली केले रक्तदान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : मुंबई येथील 26/11 मध्ये शहीद झालेले पोलीस अधिकारी, कर्मचारी व शहीद कुणाल गोसावी यांच्या स्मृती दिनानिमित्त पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये 500 जणांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले. पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय यांच्यावतीने पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिबिराचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके, तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक तय्यब मुजावर, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष हुंबे, करकंब पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर आदी उपस्थित होते. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये 500 नागरिक, विद्यार्थी, पोलीस विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी यांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला असल्याचे दिसून आले.

17 होड्या नष्ट , एक ट्रॅक्टर जप्त

अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पंढरपूर : अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे पंढरपूर येथील भीमा नदीपात्रात वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या 17 लाकडी होड्या कटरच्या साह्याने नष्ट केल्या तर अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात ट्रॅक्टर यारीसह जप्त करण्यात आला असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.

दि. 26 नोव्हेंबर 2024 रोजी पंढरपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू उत्खनन करण्यासाठी वापरण्यात येणारा ट्रॅक्टरवर कारवाई केली असून, सदर ट्रॅक्टर यारीसह जप्त करण्यात आला आहे. तसेच दिनांक 27 नोव्हेंबर 2024 रोजी पंढरपूर, इसबावी, शिरढोण, चिंचोली भोसे दरम्यान असणाऱ्या भीमा नदी पात्रात वाळू चोरी करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या एकूण 12 लाकडी होड्या कटरच्या साह्याने कापून नादुरुस्त करून नष्ट करण्यात आल्या आहेत, तसेच चळे येथे वाळू चोरीसाठी वापरण्यात येणाऱ्या 05 लाकडी होड्या जेसीबीच्या साह्याने नष्ट करण्यात आल्या आहेत.

या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी अमर पाटील, प्रमोद खंडागळे , महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे व पंढरपूर शहरचे पोलीस कर्मचारी सहभागी होते.

पंढरी संचार

वितरण व्यवस्थेचा आढावा गरजेचा

केंद्र सरकारच्या राष्ट्रीय खाद्य सुरक्षा अधिनियम (एनएफएसए) नुसार देशातील ८१.३५ कोटी नागरिकांना मोफत धान्य पुरवठा केला जात आहे. हा धान्यपुरवठा अंत्योदय अन्न योजनेत सामील असलेले कुटुंब आणि अन्य लाभार्थी कुटुंबांना पाच लाखांपेक्षा अधिक स्वस्त धान्य दुकानांच्या माध्यमातून केला जात आहे. वास्तविक जसजसा देश विकसित होत आहे, उत्पन्न वाढत आहे, अशावेळी सरकार पुरस्कृत योजनांवर अवलंबून असणाऱ्या लोकांची संख्या कमी होणे गरजेचे आहे. परंतु आपल्याकडे तसे चित्र दिसत नाही. अर्थतज्ज्ञ अशोक गुलाटी तसेच अन्य एका अभ्यासात सार्वजनिक वितरण प्रणालीचा आपल्याकडे कसा विकास झाला आणि मागणीचे आकडे कसे वाढत गेले याचे विश्लेषण करण्यात आले आहे.अर्थात यावर व्यापक चर्चा व्हायला हवी आणि तो धोरणात्मक लक्ष देण्याचा मुद्दा असावा. अभ्यासानुसार, योजनेंतर्गत वितरीत होणारे २८ टक्के अन्नधान्य लाभार्थ्यांपर्यंत पोचलेलेच नाही तर त्याचवेळी त्याची मात्र जबर किंमत महसूल विभागाला मोजावी लागली आहे. देशातील सार्वजनिक वितरण प्रणालीला (पीडीएस) जुना इतिहास आहे. मात्र ध्येय निश्चित करून काम करणाऱ्या 'पीडीएस'ची सुरुवात १९९७-९८ मध्ये झाली. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांसाठी इश्यू प्राइस हा किमान आधारभूत मूल्यांच्या (एमएसपी) ५० टक्क्यांच्या समकक्ष ठेवला. दारिद्र्यरेषेवरील कुटुंबासाठी ही किंमत एमएसपीच्या ९० टक्के समकक्ष ठेवली. या व्यवस्थेत मूल्य समायोजन प्रणाली आहे. गेल्या काही वर्षांत यात दुरुस्ती करण्यात आली. मात्र २०१३ मध्ये 'नॅशनल फूड सिक्युरिटी ॲक्ट' मंजूर होण्याबरोबरच या व्यवस्थेत सुधारणा करण्यात आली. हा अधिनियम देशाच्या ६७ टक्के लोकसंख्येला आपल्या कक्षेत आणतो. पैकी ७५ टक्के नागरिक ग्रामीण तसेच ५० टक्के नागरिक शहरात राहतात. इश्यू प्राइस कमी असल्याने सरकारचा सर्वंकष खर्च वाढत गेला. सरकारने कोरोनाच्या काळात पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजना सुरू केली आणि पात्र लाभार्थ्यांना जादा धान्य दिले. समाजातील वंचित घटकांना ही योजना उपयुक्त ठरली. मोफत धान्य योजनेची व्याप्ती वाढत गेली आणि परिणामी 'एनएफएसए'मध्ये त्याचा समावेश करण्यात आला. यानुसार पात्र लाभार्थ्यांना खाद्यान्न मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. अशावेळी अर्थव्यवस्था विकसित होऊनही गेल्या काही वर्षांत पीडीएसची व्याप्ती आणि आवश्यकता वाढत गेली आहे. चालू वर्षांसाठी केंद्र सरकारचे खाद्य अंशदान पेमेंट बिल २.०५ लाख कोटी रुपये आहे. 'पीडीएस'ची सध्याची व्याप्ती पाहता त्याच्या परिणामाचे आकलन करणे गरजेचे आहे. मात्र गेल्या काही वर्षांत तंत्रज्ञानाचा वापर वाढल्याने त्रुटी कमी राहत आहेत. परंतु अजूनही त्याची संख्या लक्षणीय आहे. २०११-१२ या काळात मागणीचा आधार पाहता शांताकुमार समितीने (२०१५) म्हटल्यानुसार, या व्यवस्थेत सुमारे ४६ टक्के त्रुटी आहेत. नव्या मागणीनुसार करण्यात येणाऱ्या पुरवठ्याच्या सर्वेक्षणाची आकडेवारी पाहता भारतीय खाद्य महामंडळ आणि राज्य सरकारने पुरवठा केलेल्या धान्यांपैकी २८ टक्के धान्य लाभार्थ्यांपर्यंत पोचलेले नसल्याचे आढळून आले. त्याचा परिणाम म्हणजे सरकारला ६९,१०८ कोटी रुपयांचे नुकसान सहन करावे लागेल. यावर्षी होणाऱ्या खर्चाव्यतिरिक्त (वाढते एमएसपी आणि अन्य खर्चामुळे होणारी वाढ) सरकारचे विविध कार्यक्रम पोषणासंबंधीच्या गरजा पूर्ण करताना दिसत नाहीत. पाच वर्षापेक्षा कमी वयोगटातील देशातील तीस टक्के मुलांचे वजन सरासरीपेक्षा कमी आहे तर पंधरा टक्के वयस्करांत 'बीएमआय' कमी आहे. अशावेळी खर्च आणि परिणाम पाहता या कार्यक्रमांचा पुनर्विचार करण्याची वेळ आली. त्यानुसार विचार केला तरच सरकार आणि लाभार्थी या दोघांसाठी या योजना परस्परपुरक ठरतील. वास्तविक सर्वंकष गरिबीत घट होत असताना लाभार्थ्यांचा पुन्हा आढावा घेतला पाहिजे. थेट रोख हस्तांतर लोकप्रिय आणि विश्वासार्ह असून ते व्यवस्थापनाच्या दृष्टीने अधिक व्यावहारिक आहे. अशावेळी खाद्य अंशदान क्षेत्रासाठीही त्याचा विचार करायला हवा.

मार्केट रेटिंग फर्म क्रिसिलच्या ताज्या अहवालाने भारतात सामान्य माणसाचे जीवन किती कठीण होत चालले आहे यावर पुन्हा एकदा प्रकाश टाकला आहे. क्रिसिलच्या ताज्या अंदाजानुसार देशात शाकाहारी थाळीची सरासरी किंमत केवळ एका महिन्यात २० टक्क्यांनी वाढली आहे. वाढीचा हा ट्रेंड बराच काळ सुरू आहे. मागील काही महिन्यांमध्ये मांसाहारी थाळीच्या किमतीत काही प्रमाणात घट झाली होती, परंतु ऑक्टोबरमध्ये हा ट्रेंड खंडित झाला. ऑक्टोबरमध्ये कांदा आणि बटाट्याचे भाव अनुक्रमे ४६ आणि ५१ टक्क्यांनी वाढले. ऑक्टोबर २०२३ मध्ये टोमॅटो सरासरी २९ रुपये प्रति किलो दराने उपलब्ध होता, तर यावर्षी त्याची सरासरी ६४ रुपये किलो दराने विक्री झाली होती. याखेरीज डाळीच्या किमती ११ टक्क्यांनी तर खाद्यतेल १० टक्क्यांनी महागले. महागाई वाढते आणि त्यानुसार उत्पन्न वाढत नाही, तेव्हा कुटुंबे काटकसर करु लागतात. पण यामुळे पोषणासह जीवन जगण्याची गुणवत्ताही बाधित होते.

अन्नधान्यांच्या महागाईचा मारा

सूर्यकांत पाठक, राष्ट्रीय उपाध्यक्ष, ग्राहक पंचायत

अन्नधान्यांसह खाद्यपदार्थांच्या किमती गगनाला भिडल्यामुळे ऑक्टोबर महिन्यामध्ये किरकोळ महागाईचा दर ६.२१ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या १४ महिन्यांतील महागाईचा हा उच्चांक आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये महागाई दर ६.८३ टक्के होता. तर ऑक्टोबर महिन्यापूर्वी सप्टेंबरमध्ये भाज्यांच्या किमती तुलनेने कमी असल्यामुळे हा दर ५.४९ टक्क्यांपर्यंत होता. महागाईचा थेट संबंध क्रयशक्तीशी असतो. महागाईचा दर ६ टक्के असेल, तर कमावलेल्या १०० रुपयांचे मूल्य फक्त ९४ रुपये असते. महागाईत होणारी वाढ आणि घसरण ही उत्पादनांची मागणी आणि पुरवठा यावर अवलंबून असते. जर लोकांकडे जास्त पैसे असतील तर ते अधिक वस्तू विकत घेतात. पर्यायाने वस्तूंची मागणी वाढते. या वाढलेल्या मागणीनुसार पुरवठा झाला नाही तर या वस्तूंच्या किमती वाढतात.सोप्या भाषेत सांगायचे तर, पैशाचा अतिप्रवाह किंवा बाजारात वस्तूंची कमतरता यामुळे महागाई वाढते. तर मागणी कमी आणि पुरवठा जास्त असेल तर महागाई कमी होईल. ग्राहक म्हणून आपण किरकोळ बाजारातून ज्या वस्तू खरेदी करतो, त्याच्याशी संबंधित किमतीतील बदल दर्शविण्याचे काम ग्राहक किंमत निर्देशांक म्हणजेच सीपीआयद्वारे केले जाते. बाजारातील सुमारे ३०० वस्तूंच्या किमतीच्या आधारे किरकोळ महागाईचा दर ठरवला जातो.

चलनवाढ किंवा उच्च पातळीवर पोहोचलेली महागाई ही आर्थिक विकासातला अडसर मानली जाते. चमकदार आर्थिक आकडेवारीच्या बातम्या सगळ्यांनाच आवडतात, पण या झगमगाटात देशातील अनेकांना खाद्यपदार्थांबाबत काटकसर करावी लागत असेल, तर आर्थिक विकासाच्या दाव्यांच्या कक्षेत कोण आहे, याचा विचार करण्याची गरज निर्माण होते. गेल्या काही महिन्यांत खाद्यपदार्थांसह इतर जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींचा सर्वसामान्यांच्या दैनंदिन अर्थकारणावर परिणाम होत आहे. विशेषतः अनेक महिन्यांपासून भाजीपाल्यांचे भाव इतके कडाडलेले आहेत की, सामान्यांना ते परवडेनासे झाले आहेत. १० रुपयांना मिळणारी मेथीची जुडी ५० रुपयांवर पोहोचली आहे. पालकही त्याच दराने विकला जात आहे. एरवी कोसळणाऱ्या भावांमुळे चर्चेत असणारा कांदा सध्या ८० रुपये किलो दराने किरकोळ बाजारात विकला जात आहे. शंभर रुपयांची नोट खिशात असली की घरच्या भाजीचा प्रश्न सुटला हे गणित आता इतिहास जमा झाले असून चार जणांच्या कुटुंबाला आठवड्याच्या भाजीपाल्यासाठी ५०० ते ६०० रुपये मोजावे लागत आहेत. तेवढी ऐपत नसल्याने अनेकांच्या ताटातून हिरवा भाजीपालाही गायब होऊ लागला आहे.

मार्केट रेटिंग फर्म क्रिसिलच्या ताज्या अहवालामध्ये भारतात सामान्य माणसाचे जीवन किती कठीण होत चालले आहे यावर पुन्हा एकदा प्रकाश टाकण्यात आला आहे. क्रिसिलच्या ताज्या अंदाजानुसार भारतात शाकाहारी थाळीची सरासरी किंमत केवळ एका महिन्यात म्हणजेच ऑक्टोबरमध्ये २० टक्क्यांनी वाढली आहे. वाढीचा हा ट्रेंड बराच काळ सुरू आहे. मागील महिन्यांत मांसाहारी थाळीच्या किमतीत काही प्रमाणात घट झाली होती, परंतु ऑक्टोबरमध्ये हा ट्रेंड खंडित झाला. गेल्या वर्षी ऑक्टोबरच्या तुलनेत गेल्या महिन्यात मांसाहारी थाळीच्या किमतीत पाच टक्क्यांनी वाढ झाली आहे. क्रिसिलच्या निरीक्षणानुसार, ऑक्टोबर महिन्यामध्ये कांदा आणि बटाट्याचे भाव अनुक्रमे ४६ आणि ५१ टक्क्यांनी वाढले. ऑक्टोबर २०२३ मध्ये टोमॅटो सरासरी २९ रुपये किलो दराने उपलब्ध होता, त्याची सरासरी किंमत ६४ रुपये किलो झाली आहे.

सामान्य गरीब कुटुंबातील, निम्न मध्यमवर्गातील कुटुंबे भाजीपाला वाढला की डाळी, आमटी, वरण खाण्याला प्राधान्य देतात. पण ऑक्टोबरमध्ये डाळी ११ टक्क्यांनी आणि खाद्यतेल १० टक्क्यांनी महागले आहे. महागाईसंदर्भात दिसून येणारा एक प्रवाह म्हणजे, जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत झालेली वाढ भविष्यात क्वचितच कमी होते. अन्नधान्याची महागाई ही बहुस्तरीय परिणाम करणारी असते. एकीकडे आहाराबाबत काटकसर केल्यामुळे कुटुंबांचे पुरेसे पोषण होत नाही. दुसरीकडे मोठ्या प्रमाणावर पैसा अन्नधान्ये, भाजीपाला, गॅस, वीजबिल यांवर खर्च झाल्यामुळे कुटुंबांकडून होणारी आर्थिक बचत आक्रसण्यास सुरुवात होते. तसेच नागरिकांच्या क्रयशक्तीवर चलनवाढीचा सर्वांत मोठा परिणाम होतो. त्यामुळेच सप्टेंबर महिन्यात संपलेल्या तिमाहीतील कॉर्पोरेट क्षेत्रातील बड्या कंपन्यांच्या विक्रीचे आकडेही अपेक्षेनुरुप दिसून आलेले नाहीयेत. चलनवाढीचा दर ६ टक्क्यांच्या पुढे गेल्यामुळे आता आरबीआयकडून व्याजदर कपात होणे ही परिकथा बनली आहे. कारण महागाईचा दर चार टक्क्यांसमीप आल्यावर व्याजदरात कपात करणार, हे आरबीआयने स्ष्ट केले आहे. महागाईची अडचण फक्त भाज्यांपुरती मर्यादित नसून याचा परिणाम इतर खाद्यपदार्थांवरही झाला असल्याने लोक आता धान्य खरेदी करताना थांबून विचार करताना दिसत आहेत. लोकांसाठी महागाई ही एक दुष्टचक्र बनली आहे. एकेकाळी लोक महागाईच्या आव्हानांना काही काळ तडजोड करून तोंड देत असत. मात्र आता लोकांच्या उत्पन्नवाढीलाही मर्यादा आल्या आहेत. बहुतेक लोकांचे उत्पन्न कमी झाल्यामुळे किंवा व्यवसायातील मंदीमुळे त्यांची क्रयशक्ती सतत कमी होत चालली आहे.

राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाची आकडेवारी पाहिल्यास, अन्नधान्याची महागाई महिना-दरमहिना करत ९.२४ टक्क्यांवरुन १०.८७ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात हा दर ६.६१ टक्के होता. ग्रामीण महागाई दरही ५.८७ टक्क्यांवरुन वाढून ६.६८ टक्क्यांवर पोहोचला आहे. शहरी महागाईचा दरही ५.०५ टक्क्यांवरुन ५.६२ टक्क्के झाला आहे. याचा अर्थ असा की, देशातील प्रत्येक क्षेत्रात महागाई वाढत चालली आहे. केंद्र सरकारने आरबीआयला महागाईचा दर ४ टक्के ठेवण्याची जबाबदारी दिली आहे. पण वाढत चाललेल्या महागाईमुळे आरबीआयने रेपो दरातील कपातीचा निर्णय लांबणीवर टाकला. आताचे सीपीआयचे आकडे पाहता रेपो दरातील कपातीसाठी पुढील वर्ष उजाडावे लागणार असे दिसते. प्रदीर्घ काळापासून उद्योगजगताकडून रेपोदरात कपातीची मागणी केली जात आहे. याचे कारण उच्च पातळीवर असणाऱ्या रेपोदरांमुळे कर्जे महागलेली आहेत. यामुळे रिअल इस्टेट, ऑटोमोबाईल आणि उद्योगक्षेत्र प्रभावीत झालेले आहे. अर्थात, महागाई कमी करणे एकट्या आरबीआयला शक्य नाही. त्यासाठी केंद्र सरकारलाही काही धोरणात्मक निर्णय घेऊन बाजारात वाढलेल्या अन्नधान्यांच्या आणि भाजीपाल्याच्या किमती कमी होणार नाहीत. हे धोरण शेतकऱ्यांना मारक ठरणार नाही, याचीही काळजी सरकारने घ्यायला हवी. अन्यथा कांदा कडाडला की त्याची भरमसाठ आयात करायची, डाळींची आयात करायची आणि त्याच वेळी कसल्याही पूर्वसुचनेनुसार साखर, द्राक्षे, तांदुळ यांची निर्यात बंद करायची अशा प्रकारचे धोरण शेतकऱ्यांचे अर्थकारण उद्ध्वस्त करणारे ठरते. खरे पाहता आजच्या डिजिटलायजेशनच्या जमान्यात सरकारकडे सर्व प्रकारची आकडेवारी जमा होत आहे. त्यावरुन शोधायचेच ठरवले तर एखादे कुटुंब महिन्याकाठी किती साखर वापरते हेही समजू शकते. मग सरकारने मागणी आणि पुरवठ्यामध्ये संतुलन राखत किमती स्थिर ठेवणारी यंत्रणा का विकसित करु नये? महागाईचा मुद्दा निवडणुकांमध्ये सुप्त प्रभाव टाकणारा ठरू शकतो, हे विसरता कामा नये.

पंचांग गुरुवार, दिनांक २८ नोव्हेंबर २०२४
कार्तिक कृ. १३, चित्रा
श्री शके १९४६, विक्रम संवत् २०८१,अनलनाम संवत्सर, दक्षिणायन, हेमंत ऋतू प्रदोष, महात्मा फुले पुण्यदिन, संत ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा, आळंदी
नक्षत्र : चित्रा, योग : सौभाग्य, करण : गरज
सूर्योदय : स.०६.३४ **सूर्यास्त :** सायं. ०५.२८ वा.
राहू काळ : राहू काळ : **दुपारी :** १:३० ते ३:००

दिनविशेष ▶१७५३: मराठा सैन्यातील पहिल्या महिला सेनापती उमाबाई दाभाडे यांचे निधन. ▶१८९०: समाजसुधारक, विशेषत: समाजातील श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक दास्याची मीमांस करणारे क्रांतरीकारक विचारवंत महात्मा ज्योतिराव गोविंदराव फुले यांचे निधन. ▶१९६७: थोर स्वातंत्र्यसेनानी पांडुरंग महादेव बापट यांचे निधन. ▶१९९९: प्रसिद्ध सारंगीवादक हनुमानप्रसाद मिश्रा यांचे निधन. ▶२०००: तेलगू भाषेतील महाकवी गरम जाशुवा यांच्या नावाने दिला जाणारा साहित्य पुरस्कार ज्येष्ठ कवी नारायण सुर्वे यांना जाहिर. ▶२००१: व्यावसायिक रंगभूमीवर दर्जेदार नाटकांच्या निर्मीतीद्वारे आपला ठसा उमटविणारे ज्येष्ठ निर्माते अनंत काणे यांचे निधन. ▶२००३: नामवंत कवी शंकर रामाणी यांचे निधन. कातरवेळ, आभाळवाटा, पालण. द्रर्पणीचे दिरप, गर्भागार, हे काव्यसंग्रह, तसेच ऊर्मिला हे त्यांचे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. त्यांच्या 'पालण' या मराठी काव्यसंग्रहास महाराष्ट्र राज्य साहित्य पुरस्कार प्राप्त आहे. ▶२००३: यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांना जाहिर.

राशीभविष्य ▲ **मेष** : आनंददायक दिवस. ▲ **वृषभ** : ओळखीतून लाभ होईल. ▲ **मिथुन** : आर्थिक बाजू नाजूक राहील. ▲ **कर्क** : आवडत्या व्यक्तींची भेट होईल.▲ **सिंह** : पथ्यपाणी सांभाळा. ▲ **कन्या** : सुखासिन दिवस. ▲ **तुळ** : अनपेक्षित कामे होतील. ▲ **वृश्चिक** : महत्वाचे निर्णय घ्याल. ▲ **धनु** : धनलाभ होईल. ▲ **मकर** : प्रकृतीमान सुधारेल. ▲ **कुंभ**: देणी द्यावी लागतील. ▲ **मीन** : स्वकमाई जादा फायदा देईल.

चिंतन व्यवसायात यशस्वी व्हायचे असेल तर लायकीच सिद्ध करावी लागते. धोके पत्करून श्रम करावे लागतात. यश मिळाले तरी डोके शांत ठेवावे लागते. अपयशाने खचून न जाता पुन्हा धडपडून उठावे लागते. प्रगतीचा मार्ग हा असाच असतो. यशाप्रत पोहचायचा हाच राजमार्ग आहे. इथे पळवाटांचा, आडवाटांचा उपयोग नसतो. **– शंतनुराव किर्लोस्कर**

व्यक्तीविशेष

महात्मा जोतिराव फुले

महात्मा जोतिराव फुले यांचा आज स्मृतिदिन. थॉमस पेन यांच्या विचारांचा प्रभाव ज्यांच्यावर पडला होता असा हा कृतीशूर समाजसुधारक. 'सामाजिक गुलामगिरी'चा अंधर सर्वत्र दाटला असताना ज्यांच्या पावलांनी 'सार्वजनिक सत्यधर्माची पहाट' भारतीयांच्या अंगणात उगवली असा हा द्रष्टा समाजसुधारक! डॉ. आंबेडकरांनी त्यांना गुरु मानले. महात्माजींनी 'खरा महत्मा' म्हणून गौरविले, तर स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'सामाजिक क्रांतिकारक' म्हणून ज्यांचे जयगान केले असा हा महात्मा. स्वातंत्र्य समता, लोकशाही, विज्ञान आणि इहवादाचा पुरस्कार करणारा हा समाजक्रांतिकारक. आपल्या पत्नीला शिकवून, पत्नीला शिक्षिका बनवून, स्त्रियांसाठी शाळा चालवली. सत्त्वहीन शोषितांना उन्नतावस्थेला आणण्यासाठी त्यांनी भारतात प्रथमच अस्पृश्यांसाठी शाळा उघडली. आपल्या कार्यासाठी सतत लेखणी चालविली. 'गुलामगिरी' 'शेतकऱ्यांचा आसूड', 'इशारा', 'सत्सार अंक १ व २', 'सार्वजनिक सत्यधर्म' अशा ग्रंथांची रचना केली. आपल्या समाजक्रांतीला स्थिर स्वरूप देण्यासाठी, समाजतील उपेक्षितांना नव्या प्रवाहात आणण्यासाठी फुल्यांनी दि. २४ सप्टेंबर १८७३ रोजी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली.

बोधकथा

असे झाले परिवर्तन

आणि मग बाई राजसला आपली माफी मागायला लावतील असा विचार ती करू लागली. आणि झालेही तसेच. राजसला माफी मागावी लागली. घरी आल्यावर रोजच्या प्रमाणे निधीने ती सर्व गोष्ट आईला सांगितली. तिला वाटले की, नेहमीप्रमाणे आई शाबासकी देईल. पण झाले उलटेच. आपण चूक करणाऱ्या राजसला शिक्षा दिली म्हणून आई खुश होईल असे निधीला वाटले खरे; पण आईकडून काही शाबासकी मिळाली नाही. आईने तिला तिची चूक दाखवून दिली. आई म्हणाली, 'निधी तू हुशार आहेस. तुझ्या मैत्रिणीही हुशार आहेत. याचा अर्थ असा नाही की, तुम्ही राजसची खिल्ली उडवायची. बिचाऱ्या राजसला प्रत्येक ठिकाणी बोलणी खावी लागतात. घरी, शाळेत आता तर वर्गातील मुलेसुद्धा त्याला चिडवू लागली आहेत. असे जर तुम्ही करत राहिलात तर त्याची शिकण्याची जेवढी क्षमता आहे तेवढेही तो शिकू शकणार नाही. उलट मनात न्यूनगंड निर्माण होऊन तो मनापासून शिकू शकणार नाही. पण याउलट तुम्ही जर त्याचे मित्र बनलात तर हळूहळू तो तुमचे बघून अभ्यासात चांगली प्रगती करू शकेल.' हळूहळू निधीला ही गोष्ट लक्षात आली आणि पटलीही. तिनं मैत्रिणींच्या मदतीने स्वत:ला बदलायचे ठरवले आणि मग त्याचा फरक लवकरच दिसू लागला. राजसमध्ये हळूहळू सुधारणा होऊ लागली आणि ज्यावेळी बाईंनी पहिल्यांदा राजसला 'गुड' शेरा दिला तेव्हा राजसपेक्षाही जास्त आनंद निधीला झाला.

(समाप्त)

जिज्ञासा

थोर गणिती पॉल डिरॅक

एका ठिकाणी त्यांनी लिहून ठेवलेल्या नोंदीनुसार रविवार वगळता रोज वीस तास ते अभ्यास आणि मनन करत असे. गणित तयार करत असे. रविवारी एकटेच दूरवर फिरायला जात असे. डोंगर टेकड्यांवर फिरणे त्यांना आवडायचे. केम्ब्रिजला आल्यानंतर अवघ्या सहा महिन्यात त्यांनी पहिला शोधनिबंध प्रसिद्ध केला. पुढील दोन वर्षांत दहा निबंध प्रसिद्ध करून केवळ तीन वर्षांत म्हणजे १९२६ मध्ये पीएचडी मिळवली. त्या काळात बिटीश विश्व विद्यालयात क्वांटम मेक्यॅनिक्स हा विषय प्रथमच त्यांनी शिकवला आणि त्याची मूलभूत समिकरणेही मांडली. केम्ब्रिजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर अवघ्या दहा वर्षांत त्यांना नोबेल पारितोषिक मिळाले. अनेकांचे संपूर्ण आयुष्य संशोधनात निघून जाते तरीही असे सन्मान मिळत नाही. पण पॉल यांना कमी वेळा अनेक मोठमोठे सन्मान मिळाले. पण त्यांना अशा समारंभांना जाणे आवडत नसे, वेळेचा अपव्यय वाटत असे. त्यांनी केम्ब्रिज येथील गणितातील सर्वोच्च मानाचे पद 'ल्युकॅशियन' प्राध्यापकाचे पद तब्बल ३७ वर्षे भूषविले. त्यांच्या क्वांटम इलेक्ट्रो डायनामिक्स या विषयातील संशोधनासाठी नोबेल मिळाले होते. त्यानंतरही त्यांनी विश्वोत्पत्ती शास्त्राकडे लक्ष केंद्रित करून बरेच संशोधन केले. पॉल डिरॅक यांना अंतरज्ञानाचीही देणगी होती. त्याच ज्ञानावर आधारित त्यांनी होल्स ही संकल्पना मांडली. त्यांना त्या वेळी बरेच जण दुसरा आईनस्टाईन म्हणत असत. असा हा महान शास्त्रज्ञ आयुष्यभर विलक्षण एकाकी आयुष्य जगला. पण गणितावरील निस्सीम प्रेमाने त्यांना एकटेपणा जाणवला नसावा.

(उत्तरार्ध)

सामान्यज्ञान

प्राण्यांची भविष्यवाणी

साप आपल्या जबड्याच्या खालील भाग जमिनीला लावून जमिनीतून निघणारे तरंग आणि सूक्ष्म हालचाली जाणून घेतो. बहुतेक प्राण्यांना हे तरंग आणि हालचाली आवाजाची माहिती होत असते. २००४ मधील एका संशोधनानुसार एखाद्या मुलाला मिरगी येणार असेल तर त्याबाबतची माहिती कुत्र्यांना चटकन होते. याशिवाय कुत्रा केवळ वासाने बॉम्बबद्दल जाणून घेतात. कुत्र्यांच्या नाकात असणाऱ्या ऑलफॅक्टरी पेशींमुळे हे शक्य होते.

(क्रमश:)

सोडवा सुडोकू

सुडोकू सोडवताना रिकाम्या चौकटीमध्ये १ ते ४ आकडे अशा पद्धतीने भरा जेणेकरून उभ्या अथवा आडव्या ओळीत तो आकडा एकदाच येईल.

क्रमांक ५१२

		1	
1		2	
	1		2
	4		

क्रमांक ५११ चे उत्तर

4	3	1	2
2	1	4	3
3	4	2	1
1	2	3	4

दोस्ती संगणकाशी

संगणकाशी संवाद साधण्यासाठी तसेच संगणकाला करावयाच्या कामासंबंधी सूचना देण्यासाठी प्रमाणपद्धत आहे. तिला प्रोग्रॅमिंग लँग्वेज किंवा संगणक भाषा म्हणतात. या सूचनांच्या एका संचाला प्रोग्रॅम म्हणतात. प्रोग्रॅमिंग लँग्वेजला कॉम्प्युटर लँग्वेजही म्हटले जाते. संगणक फक्त ० व १ हे आकडे ओळखतो. हे आकडे वापरून काम कसे करावे, हे संगणकाला त्याच्याच म्हणजे आकड्यांच्या भाषेत सांगावे लागते. ही भाषा लिहायला आणि वाचायला अत्यंत क्लिष्ट असते आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ही भाषा वापरण्याला मर्यादा येतात. म्हणूनच सामान्यांना लिहितावाचता याव्यात अशा भाषा विकसित केल्या गेल्या. सी, सी प्लस, जावा या काही लोकप्रिय संगणक भाषा आहेत.

महिलायन

आरोग्याचा अनमोल ठेवा

योग्य वयात मुलांसाठी योग्य आहाराचा तक्ता तयार करून त्यानुसार मुलांना आहार दिला तर बऱ्याच प्रमाणात लठ्ठपणापासून दूर राहता येते. काहींच्या बाबतीत हा त्रास अनुवंशिक असू शकतो पण नियमित व्यायाम आणि आहाराचा तक्ता यांच्या मदतीने वजन नियंत्रणात नक्की आणता येते.

आपल्या मुलांच्या पुढील तंदुरुस्तीची काळजी पालकांनी त्यांच्या वाढत्या वयातच घेतली पाहिजे कारण लठ्ठपणामुळेच पुढे हृदयरोग, मधुमेह, कोलेस्टेरॉल, हायपर टेन्शन यांसारखे आजार होण्याची शक्यता असते. एका विशिष्ट वयानंतर हे रोग शरीरावर प्रभाव टाकू लागतात. मात्र जे मुलं लठ्ठ आहेत त्यांना हे त्रास लवकर होऊ शकतात.१८ वर्षांपर्यंतच्या मुलांचा शारीरिक विकास खूप वेगाने होत असतो. म्हणून मुलांना नियमित व्यायामाची सवय करावी. अन्यथा लठ्ठपणा अनेक आजारांना आमंत्रण देऊ शकतो. मुलं घरात सतत टीव्ही किंवा व्हिडीओगेम खेळत असतील तर त्यावर बंधने आणावीत. मुलांना मोकळ्या मैदानात खेळू द्यावे. मुले जेवढी खेळतील, दमतील तेवढे त्यांचे शरीर तंदुरुस्त राहील. आहारात ज्यूस, हिरव्या भाज्या आणि चरबी नसलेल्या अन्नाचा समावेश असावा. ॲक्टिव्हीटी आणि नियमित व्यायाम याद्वारे लठ्ठपणाच्या समस्येवर नक्कीच मात करता येऊ शकते. लहानपणी लठ्ठपणाचे काय त्रास असतात याबद्दलची माहिती मुलांना नसते. मूल जसजसे मोठे होत जाते तसतसे त्यांचे मित्र, मैत्रिणी त्यांना चिडवू लागतात. यामुळे मुलांना नैराश्यही येऊ शकते. म्हणूनच या सगळ्या गोष्टींपासून दूर राहण्यासाठी मुलांना रनिंग, स्किपींग, सायकलींग, यांसारख्या व्यायामाची सवय लहानपणापासूनच लावावी आणि आर्थिक ठेव्यापेक्षाही तंदुरुस्त आरोग्याचा अनमोल ठेवा मुलांना द्यावा.

(उत्तरार्ध)

बालांगण

मराठी व्याकरण

चौपट मुले, दसपट रुपये, दुहेरी भूमिका, द्विगुणित आनंद या शब्दांमध्ये चौपट, दसपट, दुहेरी, द्विगुणित ही विशेषणे संख्येची किती वेळा आवृत्ती झाली हे दर्शवतात. अशा विशेषणांना आवृत्तीवाचक संख्याविशेषणे असे म्हणतात. एकेक मुलगा, दहा दहांचा गट या शब्दांमध्ये एकेक, दहादहा ही विशेषणे वेगवेगळा असा बोध करून देतात. अशा विशेषणांना 'पृथकत्ववाचक संख्याविशेषणे' असे म्हणतात.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक - **बाळासाहेब भगवानराव बडवे** यांनी ३१, 'यमुना', भक्ती मार्ग, एल आय सी ऑफिस जवळ, पंढरपूर जि. सोलापूर : ४१३३०४ येथे प्रकाशित केले. तसेच मुद्रक मुद्रक - क्रांती प्रिंटर्स प्रोप्रा. अनिरूद्ध बाळासाहेब बडवे यांनी ३१, 'यमुना,' भक्ती मार्ग, पंढरपूर येथे मुद्रित केले. कार्यकारी संपादक : प्रा. दीपक द. निकते. विभागीय कार्यालय 'पंढरी संचार', महावीर नगर, अतुल टायरच्यावर, पंढरपूर. फोन / फॅक्स: ०२१८६-२२८२२२ /२३; ९२२६३३७६२७ **http://pandharisanchar.com E-mail : dainik.pandhari@gmail.com**

एडीआरचा अहवाल; महिला अत्याचाराचे गुन्हे असलेल्या आमदारांची संख्या मोठी

नवनिर्वाचित १८७ आमदारांवर गुन्हे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : देशभर गाजलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालावर 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स' अर्थातच 'एडीआर'चा एक धक्कादायक अहवाल आला आहे. या अहवालात २८८ आमदारांपैकी नवनिर्वाचित १८७ आमदारांवर विविध स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याचे म्हटले आहे. 'एडीआर'ने आमदारांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रातील तपशीलांचा अभ्यास केला. तेव्हा अतिशय भयंकर असे वास्तव समोर आले. विशेष म्हणजे नव्या आमदारांपैकी ११८ जणांवर महिलांवर अत्याचार, भ्रष्टाचार, खून, खुनाचा प्रयत्न, निवडणूक संदर्भात गुन्हे दाखल आहेत.

महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणूक निकालात भाजप सर्वात मोठा राजकीय पक्ष ठरला. त्यांचे १३२ आमदार निवडून आले. यातल्या ९२ आमदारांवर विविध गुन्हे दाखल आहेत. त्यातही ४० टक्के आमदारांवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचे या अहवालातून समोर आले आहे. शिवसेना शिंदे यांचे ५७ आमदार विधानसभा निवडणुकीत विजयी झाले. सोबतच त्यांच्याही एकूण ४७ टक्के आमदारांवर गंभीर गुन्हे दाखल असल्याचे या अहवालात म्हटले आहे. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१ आमदार जिंकले. त्यातल्या २० आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

विधानसभा निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे २० आमदार विजयी झाले. त्यांच्या १३ आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे समजते. काँग्रेसचे १६ आमदार विजयी झाले. त्यांच्या नऊ आमदारांवर विविध गुन्हे दाखल आहेत. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे १० आमदार विजयी झाले. त्यांच्या पाच आमदारांवर विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे अहवालात म्हटले आहे. 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स'ने आपल्या अहवालात म्हटले आहे, की अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे सगळेच आमदार हे करोडपती आहेत. भाजप आणि शिवसेनेचे ९८ टक्के आमदार करोडपती असल्याचे म्हटले आहे. काँग्रेसचे साजिद पठाण हे सर्वात गरीब आमदार आहेत. त्यांची एकूण मालमत्ता फक्त नऊ लाखांची असल्याचे अहवालात म्हटले आहे. भाजपचे श्याम खोडे यांची मालमत्ता ३१ लाख आणि गोपीचंद पडळकर यांची मालमत्ता ६५ लाखांची असल्याचे म्हटले आहे.

रोहित पाटील सर्वात तरुण

- अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ हे वयोमानानुसार सर्वात ज्येष्ठ आहेत. त्यांचे वय ७७ वर्षांचे आहे. त्या खालोखाल दिलीप सोपल (वय ७५), गणेश नाईक (वय ७४) यांचा नंबर लागतो. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे रोहित पाटील हे सर्वात तरुण आमदार आहेत. त्यांचे वय २५ वर्ष आहे. त्यानंतर भाजपचे करण देवतळे (वय २९), राघवेंद्र पाटील (वय ३१) आणि उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे वरुण देसाई (वय ३२) यांचा नंबर लागतो. आमदारांमध्ये एकूण २२ महिला असल्याची नोंदही या अहवालात आहे.

» Selected

सांगलीतील बँकेत चोरीचा प्रयत्न

सांगली : सांगलीमधील तासगाव अर्बन बँकेमध्ये चोरीचा प्रयत्न झाला आहे. पहाटेच्या सुमारास दोघा अज्ञात चोरट्यांनी बँकेत शिरून चोरी करण्याचा प्रयत्न केला; मात्र चोरांच्या हाताला काहीच लागले नाही. त्यामुळे रिकाम्या हाताने चोरांना परतावे लागले आहे. हिवाळ्याचे दिवस असल्याने रात्रीच्यावेळी सहसा बाहेर फारशी रहदारी पाहण्यास मिळत नाही. याचा फायदा घेत चोरटे हात साफ करत असतात. सांगली शहरातल्या मार्केट यार्ड परिसरामध्ये असणाऱ्या तासगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या शाखेत रात्रीच्या सुमारास चोरीचा प्रयत्न झाला. बँकेचा दरवाजा तोडून चोरट्यांनी आतमध्ये प्रवेश केला होता.

येवल्यातून दीड कोटींच्या पैठणींची चोरी

येवला : येवला शहरातील नगर-मनमाड मार्गावर असलेल्या लक्कडकोट या पैठणीच्या दुकानातून सुमारे दीड कोटी रुपयांच्या पैठणी चोरट्यांनी चोरून नेल्या आहेत. या प्रकरणी पोलिसात नोंद करण्यात आली आहे. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शोरुमच्या दुकानाची खिडकी तोडत आत प्रवेश केला. यानंतर दुकानातील महागड्या पैठण्या चोरून नेल्या आहेत. ही घटना सकाळी दुकानाचे मालक सुनील लक्कडकोट यांच्या लक्षात आली. यानंतर त्यांनी याबाबत पोलिसांना फोन करून माहिती दिली.

आयआयटी तरुणाची डिजिटल अरेस्टमध्ये फसवणूक

मुंबई : आयआयटी मुंबईतील एका विद्यार्थ्याची डिजिटल अरेस्टमध्ये तब्बल सात लाख रुपयांची फसवणूक झाली आहे. विद्यार्थ्याला फसवण्यासाठी भामट्यांनी दूरसंचार नियामक प्राधिकरणाच्या नावाखाली बनावट व्हॉट्स्ॲप कॉल करून त्याच्यावर आरोप लावले आणि मोठी रक्कम उकळली. विद्यार्थ्याला एका अज्ञात व्हॉट्स्ॲप नंबरवरून कॉल आला. कॉल करणाऱ्या व्यक्तीने स्वतःला 'ट्राय'चा अधिकृत अधिकारी असल्याचे भासवले. या व्यक्तीने विद्यार्थ्याला सांगितले, की त्याच्यावर डिजिटल अरेस्ट वॉरंट जारी करण्यात आले आहे.

काँग्रेस, शिवसेनेने आळवला स्वबळाचा सूर; स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक

महाविकास आघाडी फुटीच्या वाटेवर?

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : विधानसभा निवडणुकीच्या आधी मुख्यमंत्रिपदावरून भांडणाऱ्या महाविकास आघाडीचे निकालात अक्षरश: पानिपत झाले. विधानसभेला महाविकास आघाडीतील तीनही पक्षांना मिळून ५० देखील जागा मिळाल्या नाहीत. या पराभवाची कारणमीमांसा करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या मातोश्री निवासस्थानी पराभूत उमेदवारांची बैठक घेतली. त्यात बहुतांश जणांनी स्वबळाचा सूर आळवला. त्यामुळे ठाकरे येत्या काळात महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेणार का, अशी चर्चा सुरू झाली आहे. दुसरीकडे काँग्रेसमध्येही अशीच चर्चा सुरू झाली आहे. विधानसभेच्या निवडणुकीत एकमेकांची मते परस्परांकडे हस्तांतरित झाली नाहीत, असा आरोप आता केला जात आहे.

आगामी निवडणुका पक्षाने महाविकास आघाडीतून न लढता स्वबळावर लढवाव्यात, असा सूर शिवसेनेच्या ठाकरे गटात आहे. ठाकरे यांच्यासोबत झालेल्या बैठकीत बहुतांश पराभूत उमेदवारांनी, नेत्यांनी 'एकला चलो रे'चा सूर आळवला. ठाकरे यांच्याकडे अनेकांनी तशी इच्छा व्यक्त केल्याची कबुली विधान परिषदेतील उपनेते अंबादास दानवे यांनी दिली. पक्षात अनेकांचा स्वबळाचा सूर आहे आणि आम्ही ते अजिबात नाकारत नाही. शिवसेनेने स्वतंत्रपणे लढले पाहिजे, असे बऱ्याच जणांना वाटते. शिवसेना काही सत्तेसाठी जन्माला आलेली नाही. सत्ता शिवसेनेला कधी ना कधी मिळेलच. शिवसेना एका विचाराने काम करणारी संघटना आहे. बऱ्याच जणांनी तो विचार मांडला. शिवसेनेने सगळ्या निवडणुकांमध्ये आपले स्वतंत्र संघटन उभे करुन निवडणूक लढली पाहिजे, असे दानवे म्हणाले.

शिवसेनेत स्वबळाचा सूर लावला जात असताना आता यावर काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. 'जशी त्यांची स्वबळाची इच्छा आहे, तशी आमचीही इच्छा होती. हा इच्छेचा विषय नाही. आम्ही आघाडी म्हणून लढलो आणि निकालानंतर त्यांनी काय करायचे तो त्यांचा निर्णय आहे. त्यांनी त्यांची भूमिका मांडली. आमची भूमिका आमचे प्रदेशाध्यक्ष मांडतील, आम्हीही मांडू; पण आम्ही काही इतक्या घाईने भूमिका मांडणार नाही.

आमदारांना मतदारसंघात जाण्याचे शिंदेचे आदेश

आमदार, खासदारांच्या भेटी टाळल्या

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : मुख्यमंत्रिपद मिळत नसल्याचे स्पष्ट होताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नाराज आहेत. त्यांचे समर्थकही नाराज झाले आहेत. पत्रकार परिषदेत जरी शिंदे यांनी तसे दाखवले नसले, तरी त्यांना नाराजी लपवता आली नाही.

निकाल लागल्याच्या दुसऱ्या दिवसापासून शिंदे यांनी मौन बाळगले होते. शिंदे यांनी आमदार, खासदारांच्या भेटीगाठीही टाळल्या आहेत. इतकेच नाही तर त्यांनी आमदारांना मुंबईत न थांबता आपल्या मतदारसंघात जाण्याचे आदेश दिले आहेत. आपआपल्या मतदारसंघात जा विजयाचा जल्लोष साजरा करा, विजयी रॅली काढा, असे त्यांनी सांगितले आहे. मंत्रिपदासाठी शिंदेसेनेचे अनेक आमदार मुंबईत तळ ठोकून बसले आहेत; मात्र अद्याप यावर कुठलाही निर्णय झालेला नाही.

मंत्रिमंडळात शिवसेनेच्या किती आमदारांना संधी मिळणार हे कळू शकलेले नाही. यंदा महायुती नव्या चेहऱ्यांना संधी देणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे शिंदे यांच्या आमदारांचे टेन्शन वाढले आहे. त्यातच आता शिंदे यांनी आमदारांना मुंबईत थांबू नका आपआपल्या मतदारसंघात जाण्याचे आदेश दिल्याने चिंता आणखी वाढली आहे. कारण, भाजपला सर्वाधिक जागा मिळाल्याने शिंदे गटाला मंत्रिमंडळात त्यांच्यापेक्षा कमी मंत्रिपदे मिळू शकतात. मंत्रिपदाचे आकडेही वेगवेगळे दिले जातात. शाह यांच्याशी उद्या होणाऱ्या बैठकीत त्यावर निर्णय होऊ शकतो.

बॅलेट पेपरवरील निवडणुकीसाठी जनआंदोलनाचा काँग्रेसचा निर्णय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नागपूर : महायुतीला मिळालेल्या यशावर महाविकास आघाडीने 'ईव्हीएम' मशीनवर शंका उपस्थित केली आहे. तसेच निवडणुका बॅलट पेपरवर घेण्याची मागणी केली जात आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले माध्यमांशी बोलताना म्हणाले, जनतेचा आवाज बनून आम्ही आता जनआंदोलन सुरू करणार आहोत. जनतेला वाटत आहे, की निवडणूक बॅलट पेपरवर घेण्यात यावी. बॅलट पेपरवरील निवडणुकांसाठी सह्यांची मोहीम आम्ही राबवणार आहोत.

मतदान करण्याचा अधिकार आहे; मात्र मशीन आमचे मत चोरत असल्याची भावना जनतेत असल्याचे पटोले यांनी सांगितले. ते म्हणाले, की राहुल गांधी यांच्या नेतृत्वात जनआंदोलन आम्ही सुरू करणार आहोत. तसेच आम्ही निर्णय घेतला आहे, की राहुल गांधी यांचे जन आंदोलन हे महाराष्ट्रात सर्वात मोठ्या प्रमाणात असणार आहे.

मुंबईत 'इंटर डेअरी एक्स्पो २०२४' चे आयोजन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नागपूर : भारतीय दुग्धव्यवसायाने गेल्या दशकात उल्लेखनीय प्रगती केली आहे. प्रगतीचा हा आलेख असा सुरू राहावा यासाठी व्हीए एक्झिबिशन्स आणि इंडिया डेअरी असोसिएशन (पश्चिम झोन) यांच्या सहकार्याने ५ ते ७ डिसेंबर २०२४ दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे 'इंटर डेअरी एक्स्पो २०२४ ' चे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात या क्षेत्रातील संपूर्ण पुरवठा साखळीशी संबंधित घटक पाहता येणार असून दुग्धव्यवसायातील नवकल्पना, तंत्रज्ञान आणि संधी जाणून घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरेल. टिकाऊ तंत्रज्ञान, आधुनिक पॅकेजिंग, प्रक्रियेतील नवीन उपाय आणि प्रगत ऑटोमेशन अशा अनेक गोष्टी या प्रदर्शनात पाहायला मिळतील. या प्रदर्शनात १२० हून अधिक भारतीय आणि जागतिक कंपन्या सहभागी होतील. सध्या, भारत हा जगातील सर्वाधिक दुग्धोत्पादन करणारा देश आहे. जागतिक पातळीवर होणाऱ्या एकूण दूध उत्पादनापैकी २४ टक्के दुग्धोत्पादन भारतात होते.

हेल्मेटने डोके काढले वर; दोघांनाही हेल्मेट बंधनकारक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : दुचाकी चालवणाऱ्या चालकांसाठी एक महत्वाची बातमी आहे. मुंबईत आता दुचाकी चालवणाऱ्यासह मागे बसणाऱ्या व्यक्तीला हेल्मेट सक्ती करण्यात आली आहे. दुचाकीस्वार आणि मागे बसणाऱ्या व्यक्तीला हेल्मेट वापरणे बंधनकारक असेल. त्यामुळे आता दुचाकी चालवताना दोघांनाही हेल्मेट घालणे बंधनकारक असणार आहे. विना हेल्मेट दुचाकीस्वार व पिलियन रायडर (सह प्रवासी) यांचे अपघात व त्या मृत्युमुखी तसेच जखमींच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे. त्यामुळे विना हेल्मेट दुचाकीस्वार व पाठीमागे बसलेल्या दोघांवर कारवाई करण्याचे आदेश वाहतूक विभागाचे अपर पोलीस महासंचालकांनी राज्यातील सर्व पोलीस आयुक्त व पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. त्याबाबतचे पत्र नुकतेच सर्वांना पाठविण्यात आले आहे. आता सहप्रवाशांवर स्वतंत्र हेड खाली कारवाई होणार असून त्यासाठी ई चलान मशीनमध्ये बदल करण्यात आला आहे.

राज्यात सर्व मोठ्या शहरांमध्ये दुचाकीस्वारांना हेल्मेट सक्ती करण्याविषयी रोष व्यक्त केला जातो. असे असले तरी सध्या वाहतूक पोलीस सीसीटीव्हीच्या माध्यमातून विनाहेल्मेट दुचाकीस्वारावर कारवाई करत असतात. सध्या तरी राज्यात दुचाकीवरील पिलियन रायडर (सहप्रवासी) यांच्यावर कारवाई केली जात नाही. त्याच्यावरही कारवाई करण्यात येणार असून त्यासाठी ई चलान मशीनमध्ये स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे.

निवडणूक आयोगाचा महाआघाडीला दिलासा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नाशिक : महाराष्ट्रविधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान पार पडले व २३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर झाला. या निकालात महायुतीची प्रचंड मोठी सुनामी आल्याचे पाहायला मिळाले. महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला व त्यांना ५० चा आकडाही गाठता आला नाही. त्यानंतर ईव्हीएमवर संशयाचे मोहोळ उठले आहे. विरोधकांनी ईव्हीएमविरोधात आवाज उठवण्यासाठी विरोधकांकडून पुन्हा वज्रमूठ करण्यात आली आहे. तसेच काही ठिकाणी फेर मतमोजणीची मागणी करण्यात आली आहे. नाशिक पश्चिम मतदार संघात पुन्हा फेर मतमोजणी करण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार सुधाकर बडगुजर यांनी केली होती. त्यांची मागणी निवडणूक आयोगाने मान्य केली आहे. त्यासंदर्भातील पत्र नाशिकच्या जिल्हाधिकाऱ्याने सुधाकर बडगुजर यांना दिले आहे.

नाशिक जिल्ह्यात सर्वाधिक मतदारसंख्या असणाऱ्या नाशिक पश्चिम मतदारसंघात भाजपच्या उमेदवार सीमा हिरे विजयी झाल्या आहेत. त्यांना १ लाख ४१ हजार ७२५ मते मिळाली असून शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख सुधाकर बडगुजर यांचा हिरे यांनी ६८ हजार १७७ मतांनी पराभव करत हॅटट्रिक साधली. बडगुजरांना ७३ हजार ५४८ मते मिळाली आहेत.

मनसेनेही पराभवाचे खापर फोडले 'ईव्हीएम'वर

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : महाविकास आघाडीपाठोपाठ मनसेने ही पराभवाचे खापर 'ईव्हीएम'वर फोडले आहे. मनसेचे अविनाश जाधव यांनी 'ईव्हीएम'वर रोख ठेवला आहे. महायुतीने मनसेची फसवणूक केल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

"महाराष्ट्र विधानसभेचा निकाल आम्हाला मान्यच नाही. कोविड काळात मनसैनिकांनी काम केले. जे आमदार कोणाला भेटत नव्हते, कोणाच्या घरी जात नव्हते ते आमदार लाख लाख मतांनी निवडून येतात. मी खात्रीने सांगतो 'ईव्हीएम'शिवाय ही गोष्ट अशक्य होती. कारण सरकारकडे पैशांची कमतरता नाही", असे ते म्हणाले. भाजपाचा विजय झाल्याने अनेक पक्षांना उतरती कळा लागली आहे. हे 'ईव्हीएम'मुळे शक्य झाले. एवढे मोठे यश आल्यावर इतर लोकांमध्येही आनंद नाही. अनेकांना प्रश्न पडला, की आमचे मत गेले कुठे? हे मत 'ईव्हीएम'च्या घशात गेले. देशातील १४० कोटी जनतेला कळाले, की आपल्या देशात काहीतरी चुकीचे चालले, असे ते म्हणाले.

"अमेरिकेसारख्या देशात बॅलटवर निवडणुका होत असतील तर इथे काय अडचण आहे? हे आम्ही २०१९ लाही म्हणत होतो. आता खात्रीने सांगतो, की आमची फसवणूक झाली. कोर्ट त्यांचे, निवडणूक आयोग त्यांचा. आम्ही कोणाला विचारायचे? शिवसेनेनेच्या प्रकरणात निर्णय आलेला नाही. पुढच्या निवडणुका आम्ही लढवायच्या की नाहीत. सगळे सेट होते, तर मनसे नावापुरती होती. सगळ्या त्यांच्या आल्या असत्या तर लोकांनी चपलेने मारले असते. मनसे एक बहाणा आहे. त्यांना हवा तो अपेक्षित निर्णय त्यांनी आणला, अशी टीका जाधव यांनी केली.

पार्थ पवारांचा अमोल मिटकरींना इशारा

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत जनतेचा कौल महायुतीच्या बाजुने लागला. निवडणुका पार पडताच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदारअमोल मिटकरी नव्या वादात अडकले आहेत. यानंतर त्यांच्यावर टीका होतअसतानाच अजित पवारांचे पुत्रपार्थ पवारांनी अमोल मिटकरींना खडसावलं आहे.पार्थ पवारांनी इंग्रजीतून ट्विट करत मिटकरींना घरचा आहेर दिला आहे. पार्थ पवार यांनी इंग्रजीमधून ट्विट करत म्हटले की, हे अत्यंत दुर्दैवी आहे की अमोल मिटकरी पक्षाचे आमदार असूनही पक्षविरोधी भूमिका घेणे पसंत केले आहे. डिझाइन बॉक्स आणि नरेश अरोरा संदर्भातील त्यांच्या वक्तव्याचा माझा पक्ष आणि माझे वडिल अजिबात समर्थन करत नाहीत. या प्रकरणावर अशा प्रकारची टिप्पणी व मीडियाशी संवाद साधू नये असा इशाराही पार्थ पवारांनी मिटकरींना दिलाआहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससाठी निवडणूक कॅम्पेन पीआर कंपनी डिझाईन बॉक्स तसेच कंपनीचे प्रमुख नरेश अरोरा यांनी केले होते. निवडणुकीत यश मिळाल्यानंतर नरेश अरोरा यांनी अजित पवारांनी भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.

मात्र,यावेळी त्यांनी अजित पवारांच्या खांद्यावर हात ठेवल्याने वाद निर्माण झाला आहे. आमदार अमोल मिटकरी यांनी नरेश अरोरा यांना अमोल मिटकरींनी झापलं होतं. शेवटी तुम्ही पगारीवरील शिपाई असल्याचा टोलाही त्यांना लगावला होता. आता अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी या वादात उडी घेतली असून मिटकरींना सुनावले आहे.

सौदी अरेबियाचा साडेतीन लाख कोटी रुपयांचा प्रकल्प हलवण्याची तयारी

महाराष्ट्रातील मोठा प्रकल्प राज्याबाहेर जाणार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

मुंबई : राज्यात विधानसभा निवडणुका होऊन निकाल लागून पाच दिवस झाले, तरी अद्याप सरकार स्थापन झालेले नाही. यातच महाराष्ट्रासाठी एक धक्कादायक बाब समोर येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून कोकणात रखडलेल्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाला गुजरात किंवा आंध्र प्रदेशमध्ये हलविण्याची तयारी केंद्र सरकारने केली आहे. कोकणातील रत्नागिरी येथे होणारा सौदी अरेबियाचा साडेतीन लाख कोटी रुपये गुंतवणुकीचा तेलशुद्धीकरण प्रकल्प आता गुजरात आणि आंध्रमध्ये जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या दोन्ही प्रकल्पातील तेल शुद्धीकरणाची वार्षिक क्षमता १० ते १५ दशलक्ष टन आहे.

रत्नागिरीमध्ये होणारा मूळ प्रकल्प यापेक्षा कितीतरी मोठा होता; मात्र गेल्या काही वर्षांपासून जमिनीचे अधिग्रहण न करता आल्यामुळे प्रकल्प लांबला होता. या प्रकल्पात तेल शुद्धीकरणासह इतर पेट्रोकेमिकल सुविधाही असणार होत्या. आता गुजरातमध्ये होऊ घातलेल्या तेल शुद्धीकरण प्रकल्पासाठी 'सौदी अरामको'शी भारतीय कंपनी 'ओएनजीसी' भागीदारी करणार आहे, तर आंध्र येथील नियोजित प्रकल्पासाठी 'बीपीसीएल'चा समावेश केला जाऊ शकतो. या प्रकल्पांना सौदी अरेबियाकडून कच्च्या इंधनाचा पुरवठा केला जाईल.

पुढील महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सौदी अरेबियांच्या नेत्यांमध्ये बैठक होणार आहे. त्याआधी या प्रकल्पांवर चर्चा होत आहे. मोदी यांच्या बैठकीच्या माध्यमातून सौदी अरेबियाची भारतातील गुंतवणूक अधिक वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. याआधी सौदी अरेबियाने भारतात बंदरे, रेल्वे आणि जलवाहतुकीमध्ये शंभर अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचे आश्वासन दिले होते. आंध्र प्रदेशचे विभाजन होण्याआधीच त्यांना तेल शुद्धीकरण प्रकल्प देण्याचे आश्वासन केंद्राकडून देण्यात आले होते. गुजरातला या प्रकल्पासाठी निवडले गेले, तर जामनगर आणि बडोदा येथील सध्या अस्तित्त्वात असलेल्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाच्या ठिकाणी नवीन प्रकल्प उभारला जाऊ शकतो.

अन्य राज्यात का?

- कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात तेल शुद्धीकरण प्रकल्प येणार होता; मात्र स्थानिकांकडून या प्रकल्पाला मोठ्या प्रमाणात विरोध केला गेला. त्यामुळे प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण करणे अवघड झाले. तसेच जमीन उपलब्ध न झाल्यास ६० दशलक्ष टन शुद्धीकरण प्रकल्प सुरू करणे अशक्य होते.

विश्ववेध

नव्या टायरला छोटे काटे का असतात ?

आपण नेहमीच काही गोष्टी पाहत असतो; पण त्या तशाच का आहेत, याचा फारसा विचार करीत नाही. तुम्ही पाहिलं असेल की, तुम्ही जेव्हा एखादं नवं वाहन खरेदी करता तेव्हा त्याच्या टायरला छोटे-छोटे स्पाईकसारखे स्ट्रक्चर असतं. त्याचा आकार छोट्या काट्यांसारखा दिसतो. आता प्रश्न असा निर्माण होतो की, हे काटे या टायरला का असतात व त्याचं नेमकं काम काय आहे? अनेकांना याचं खर कारण माहीत नसणार. आज आपण याबाबत माहिती जाणून घेणार आहोत.

आपल्या सर्वांना एक गोष्ट ठावूक आहे की, सुरक्षेच्या दृष्टिकोणातून खराब झालेले आणि जास्त घासलेले वाहनांचे टायर बदलले जातात. तुम्ही सर्वांनी पाहिलं असेल की, तुम्ही जेव्हा एखादी गाडी खरेदी करता तेव्हा त्या वाहनाच्या चाकांना छोटे-छोटे स्पाईक्स असतात. हे स्पाईक्स कडक नसतात, मऊ असतात; मात्र ते वाहनांच्या चाकामध्ये एखादा काटा फसावा असे उभे दिसतात. चाकांना लावण्यात आलेल्या या स्पाईकला अनेक नावं आहेत. काही ठिकाणी याला निब असं म्हणतात, तर काही लोक याला निपर्स किंवा स्पाईक असं म्हणतात. टायर निर्माण होत असतानाच हे स्पाईक्स त्याच्यासोबतच तयार होतात. म्हणजे या काट्यांना किंवा स्पाईकला वाहनांच्या टायरला वेगळं लावण्यात येत नाही, किंवा त्याची वेगळी निर्मितीदेखील होत नाही. टायर बनवताना सर्वात प्रथम द्रव रूपात

असलेल्या रबराला साच्यामध्ये टाकलं जातं. द्रव रूपातील रबर हे संपूर्ण साच्यामध्ये पसरावं यासाठी हवेच्या दबावाचा उपयोग केला जातो. हवेच्या दबावामुळे रबर आणि साच्यामध्ये हवेचे बुडबुडे निर्माण होतात; मात्र टायर बनत असताना हे जर हवेचे बुडबुडे तसेच राहिले, तर त्याचा परिणाम हा चाकाच्या क्वॉलिटीवर होण्याची शक्यता असते. त्यामुळे हे बुडबुडे काढून टाकण्यासाठी एक विशिष्ट पद्धत वापरली जाते. टायरच्या छोट्या-छोट्या छिद्रांमधून हवा बाहेर काढली जाते. या प्रक्रियेदरम्यान रबराचा काही भाग टायरच्या वर येतो, हा भाग सुकल्यानंतर त्याचा आकार काट्यासारखा दिसतो. याचाच अर्थ हे स्पाईक्स मुद्दाम तयार केले जात नाहीत. एखाद्या चाकाला स्पाईक्स आहेत, याचा अर्थ ते टायर नवं आहे, असा त्याचा अर्थ होतो, इतकेच!

सर्वात मोठी चपाती!

संपूर्ण जगात अशा अनेक आश्चर्यकारक गोष्टी आहेत ज्यांच्याविषयी आपल्याला काहीच माहीत नाही. त्यापैकी एक अशी गोष्ट आहे ती म्हणजे एक चपाती आहे ती इतकी मोठी असते की त्यामध्ये आपल्या आठ चपात्या होतील! तिचा आकार हा सामान्य चपातीच्या तुलनेत आठपट जास्त असतो. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे ही चपाती युनेस्कोनं त्यांच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट केली आहे.

चपाती ही संपूर्ण जगात खाल्ली जाते. प्रत्येक देशात चपातीचा एक वेगळा प्रकार बनवण्यात येतो, पण तुम्हाला माहीत आहे का की आर्मेनियामध्ये एक असा चपातीचा किंवा रोटीचा प्रकार आहे ज्याचा आकार भलताच मोठा असतो. ही चपाती सर्वसाधारण चपातीच्या तुलनेत आठ ते दहापट जास्त मोठी असते. आर्मेनियाच्या या लोकप्रिय असलेल्या चपातीला किंवा रोटीला लावश असं म्हणतात. ही चपाती जगातील सगळ्यात मोठ्या चपात्यांपैकी एक आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे ही चपाती तंदूरमध्ये बनवण्यात येते. ही चपाती सगळ्यात आधी आर्मेनियामध्ये बनवण्यात आली. ती अजरबैजान, इराण आणि तुर्कीमध्ये देखील लोकप्रिय आहे. त्याचे सांस्कृतिक महत्त्व पाहाता त्याचं जागतिक वारसा यादीत देखील सहभागी करण्यात आले आहे. या चपातीचा संबंध केवळ उदरभरणासाठी नाही तर त्यासोबत अनेक सांस्कृतिक परंपरांशी त्याचा संबंध आहे.

चीन, जपानमध्ये चहापानाला जसे एक धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व असते तसाच हा प्रकार आहे. ही चपाती बनवल्यानंतर तिची घडी घालून व डबाबंद करून बराच काळ ठेवण्यात येतं. लवाश, पीठ, पाणी, यीस्ट, साखर आणि मीठ मिक्स करून ही चपाती बनवण्यात येते. अनेक ठिकाणी ही चपाती यीस्ट आणि साखरेशिवाय देखील बनवतात. तर ही चपाती चविष्ट बनवण्यासाठी तंदूरमध्ये टाकण्याआधी त्यावर तीळ आणि खसखस वरून टाकण्यात येतं. या चपातीला दोन्ही बाजूने पसरवून तंदूरमध्ये शिजवण्यात येतं. तर ही नरम रहावी यासाठी त्याला फोल्ड करून पॅक करण्यात येतं. तुम्ही वर्षभर ही चपाती खाऊ शकता. काही काळानंतर तुम्ही याला पापडसारखे खाऊ शकता आणि तेव्हाही ही चपाती तितकीच चविष्ट लागत

रोबोंचा नृत्यविक्रम!

गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्मध्ये अनेक भन्नाट विक्रमांची नोंद असते. त्यामध्ये रोबोंच्या नृत्याचीही नोंद पाहायला मिळते. इटलीत तब्बल १३७२ रोबोंनी एकत्रितपणे हे नृत्य केले होते व त्याची नोंद रेकॉर्ड बुकमध्ये झाली होती. इटलीतील या विक्रमाने चीनमध्ये झालेला यापूर्वीचा विक्रम मोडला होता. २०१६ पासून टेक कंपन्या नर्तक रोबोंची निर्मिती करीत असून एकाचवेळी जास्तीत जास्त रोबोंनी नृत्य करण्याचे नवे नवे विक्रमही घडत आहेत.

इटलीत २०१८ मध्ये हा अनोखा विक्रम झाला होता. त्यापूर्वी चीनमध्ये २०१७ मध्ये १०६९ डोबी यंत्रमानवांनी एकत्रित नृत्य केले होते. हे सर्व रोबो ह्युमनॉईड म्हणजेच मानवी आकाराचे रोबो आहेत. इटलीत 'अल्फा १ एस' रोबोंनी सामूहिक नृत्य केले. हे रोबो ४० सेंटीमीटर उंचीचे होते व ॲल्युमिनियमच्या संमिश्रापासून बनवलेल्या प्लास्टिक आवरणाने ते आच्छादित होते. विशेष म्हणजे चीनी रोबोंचा विक्रम इटलीत मोडणारे हे रोबोही चीनमध्येच बनलेले होते. चीनच्या उबटेक या कंपनीने हे रोबो बनवले. याच रोबोंनी चीनमध्ये २०१६ मध्ये प्रथमतः नृत्य केले होते. 'अल्फा १ एस' रोबो हे लवचिक असून ते नृत्यातील वेगवेगळ्या लयी संगीतानुसार बदलू शकतात. हे सर्व ह्युमनॉईड रोबो सारख्या वेळेत न चुकता नृत्य करीत आहेत, याची खात्री करून त्यांच्या विक्रमांची नोंद करण्यात आली होती.

सर्वात दूरवरचा तारा

अंतराळाच्या अनंत पसाऱ्यात अनेक ग्रह-तारे आहेत. 'नासा'च्या अंतराळात सोडलेल्या अनेक दुर्बिणी अशा दूरस्थ ग्रह-ताऱ्यांचा शोध घेत असतात. आतापर्यंतचा सर्वात लांबचा ताराही 'नासा'च्या अशा स्पेस टेलिस्कोपने शोधलेला आहे. विश्वाच्या मध्यावर निळ्या रंगात असणाऱ्या या विशाल ताऱ्याचे नाव 'इकारस' असे ठेवलेले आहे. हा तारा इतका दूर आहे की, या ताऱ्याचा सूर्यप्रकाश पृथ्वीपर्यंत पोहोचण्यासाठी नऊ अब्ज वर्षे लागतील! जगातील सर्वात मोठ्या, शक्तिशाली दुर्बिणीनेही हा तारा धूसर दिसू शकतो.

गुरुत्वाकर्षण लेन्सिंग नावाच्या प्रक्रियेमुळे धुसर तारा चमकू शकतो. यामुळे खगोलशास्त्रज्ञ दूरवरील ताऱ्यांनाही पाहू शकतात. बर्कले युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियामधील संशोधकांनी हा तारा शोधला आहे. या संशोधनाचे नेतृत्व पेट्रिक केली यांनी केले. आकाराने मोठा आणि विशिष्ट लक्षणे असलेला एकमेव तारा हे त्याचे वैशिष्ट्य असल्याचे त्यांनी म्हटले आहे. हा तारा ज्याठिकाणी आहे, त्याच्या आसपास अनेक आकाशगंगा आहेत; मात्र त्यामधील ताऱ्यांपासून किमान शंभरपट दूर अंतरावर एकाकी आहे. अत्यंत दूरवर असलेल्या या ताऱ्याच्या शोधामुळे ब्रह्मांडाच्या निर्मितीच्या काळातील अनेक रहस्ये उलगडण्यास मदत होऊ शकते.



कासव गडद रंगांना घाबरतं?

कोणत्याही प्राण्याला जर कोणत्या गोष्टीपासून धोका असेल, तर लगेचच ते प्रतिकार करण्याच्या मोडमध्ये येतात. असंच कासवाचंदेखील आहे; पण कासव गडद रंगांच्या गोष्टींना का घाबरते जाणून घ्या. कासवांपासून काळ्या किंवा इतर गडद रंगाच्या वस्तू दूर ठेवल्या पाहिजेत.

तलाव, नदी किंवा कोणत्याही जलाशयाच्या आजूबाजूला तुम्ही कासवे पाहिली असतील; पण तुम्हाला माहीत आहे की, कासवांचे काळ्या रंगाबद्दल एक वेगळेच वर्तन असते. ज्यामुळे ते आक्रमक होऊ शकतात. सोशल मीडियावर तुम्ही पाहिले असेल की, कासवाला समोर काळ्या रंगाच्या वस्तू दिसल्या की ते लगेच त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करते. काळे शूज असो किंवा इतर कोणत्याही काळ्या वस्तू दिसल्या की कासव आक्रमक होते. संशोधनात असे समोर आले आहे की, कासवांना काळ्या रंगाचा तिरस्कार नसतो. काळा रंग ते त्यांच्या भक्षकांशी जोडतात. काळा रंग हा त्यांच्यासाठी संभाव्य धोका दर्शवितो. ज्यामुळे ते सावध होतात. जेव्हा-जेव्हा त्यांना काळ्या रंगाचे काही दिसते, ते त्याच्याकडे शिकारी असल्यासारखे पाहतात. आपल्या शैलीने ते त्याला मारण्याचा प्रयत्न करतात. हा त्यांच्या नैसर्गिक संरक्षण यंत्रणेचा भाग असतो. कासवांना केवळ काळाच नाही, तर इतर रंगदेखील ओळखता येतात. लाल, हिरवा, निळा, केशरी, पिवळा असे रंग ते ओळखण्याची क्षमता ठेवतात. काही कासव जे समुद्रात असतात किंवा स्लाइडर कासवं जे हिरव्या आणि निळ्या रंगांकडे अधिक आकर्षित होतात, कारण ते त्यांच्या सागरी वातावरणाच्या जवळ असतात; परंतु गडद रंगाचा, विशेषत: काळा ते बऱ्याचदा विरोध करतात. जंगलात गडद रंग हे धोकादायक शिकारींचे प्रतीक मानले जातात. कासव त्यांच्या नैसर्गिक वातावरणात अशा रंगांना भक्षकांशी जोडतात. उदाहरणार्थ, कावळे आणि साप यांसारखे शिकारीही गडद रंगाचे असतात. या कारणास्तव, कासव काळा रंग पाहून सावध होतात आणि आक्रमक प्रतिक्रिया देतात.

माणूस आयुष्यभरात किती अन्न खातो?

अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. 'उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' असे आपण म्हणत असलो, तरी हल्ली अनेक माणसं जेवणावर आडवा हात मारून आडवे होण्याच्याच विचारात असतात. अर्थात अन्न आपल्या जीवनाचा एक अतिमहत्त्वाचा भाग आहे. आपण जे काही करतो ते अन्न मिळवण्यासाठीच करतो. आपण दिवसभरात काही ना काही खात असतो; मात्र एखादा माणूस आयुष्यभरात किती किलो अन्न फस्त करतो, हे तुम्हाला माहिती आहे का? विस्कॉन्सिन स्टेट जर्नलमधील एका लेखानुसार, आपण आपल्या आयुष्यातील सुमारे २.५ वर्षे स्वयंपाक करण्यामध्ये आणि ३.६ वर्षे खाण्यात घालवतो. याचाच अर्थ आपण दररोज सुमारे ६७ मिनिटे अन्न खात असतो. विचार करा की एक व्यक्ती त्याच्या आयुष्यात किती अन्न खात असेल! अहवालानुसार, एक व्यक्ती त्याच्या आयुष्यात सुमारे ३५ टन (३५००० किलो) अन्न खातो; पण या ३५ टनांमध्ये आपण काय काय खाल्ले ते देखील महत्त्वाचे असते. कारण, आपण जे खातो ते आपल्या आरोग्यासाठी चांगले आहे का? हे देखील तपासून पाहावे. बरेच लोकांना आरोग्यासाठी पोषक अन्न खाण्याची आवड असते; परंतु ते हवे तितके सोपे नाही. कारण, अनेकांना मग फास्टफूड, मिठाई आणि सोडा असलेले अन्न खाण्यापासून स्वत:ला रोखावे लागेल; पण हे नेहमीच शक्य होईल का, हा प्रश्न आहे, तरीही केवळ चवीसाठी नव्हे, तर आरोग्य व दीर्घायुष्यासाठीही पोषक अन्नावर भर देणे गरजेचे आहे.

मत्स्याहार आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त मानला जातो; पण मासे खाल्ल्यामुळे वजन घटवण्याचा विचार तुम्ही कधी केलाय का? आहारतज्ज्ञांच्या मते तुम्हाला मासे खायला आवडत असतील, तर ग्रिल किंवा बेक करून मासे खाल्ले असता त्याचा शरीराला खूप उपयोग होऊ शकतो; मात्र अतिरिक्त प्रमाणात मासे खाणेही योग्य नाही. एका महिलेने मात्र तीन महिने फक्त मासे खाल्ले आणि १५ किलो वजन कमी केले, असा दावा केला आहे. हे पाहता तिचे डॉक्टरही थक्क झाले आहेत.

वेटलॉससाठी तीन महिने फक्त मत्स्याहार

न्यूयॉर्क पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार ही महिला फ्लोरिडाची रहिवासी आहे. जेन क्रुमेट असे तिचे नाव आहे. ती ६२ वर्षांची आहे. नुकतीच ती सेवानिवृत्त झाली. काही महिन्यांपूर्वी तिचे वजन १०९ किलो होते. ती एवढी वैतागली होती की, तिला चालता-फिरताही येत नव्हते. ती एका डॉक्टरांना भेटली. त्यांनी तिच्या खाण्या-पिण्यावर अनेक निर्बंध घातले. त्याचा तिला काहीच उपयोग झाला नाही.

जेन म्हणाली, माझे पाय खूप दुखत असत. पायांवर सूजही आली होती. खूप भूक लागायची. त्यामुळे मी काहीही खात असे. मी वैतागले होते आणि वजनापुढे हात टेकले होते. त्याचवेळी मला डॉ. एनेट बोसवर्थ भेटली. ती डॉ. बोज म्हणून ओळखली जाते. तिने वजन कमी करण्यासाठी सांगितलेला उपाय आश्चर्यजनक होता.. तिने मला फिश फास्टची आयडिया दिली. साहजिकच प्रश्न पडला, फिश फास्ट म्हणजे काय?

याचा अर्थ की, मी तीन महिने फक्त आहारात मासेच खायची. सार्डिन मासा खावा, असे तिने मला सुचवले. त्यामुळे वजन लवकर कमी होईल, असेही ती म्हणाली. मला आधी हे जरा विचित्र वाटले; पण तिने त्याचे फायदे सांगितल्यामुळे मी फिश फास्ट करून बघायचे ठरवले, असेही जेनने स्पष्ट केले. सार्डिन मासा खाल्ल्यामुळे अन्नाचे पचन लवकर होते. बॉडी फॅटचे ज्वलन लवकर होते आणि त्याचे ऊर्जेत रूपांतर होते. डॉ. बोजचा सल्ला ऐकून जेनने रोज सार्डिन मासा खायला सुरुवात केली. हा एक तेलकट मासा आहे. तरीही जेन रोज चार डबे सार्डिन मासे खात असे. त्यामुळे तिला सुमारे १५०० कॅलरी मिळत. सार्डिन मासे खायला सुरुवात केल्यानंतर दोन आठवड्यांतच तिला फरक जाणवण्यास सुरुवात झाली. तिचे सहा किलो वजन कमी झाले. तीन महिन्यांत तिने चक्क १५ किलो वजन घटवले.

सार्डिन हा अत्यंत गुणकारी मासा आहे. अमेरिकेत आजारी व्यक्तींना तो खाण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जातो. त्यात ओमेगा थ्री फॅटी ॲसिडस्, प्रोटीन, व्हिटॅमीन डी आणि कॅल्शियम असते. कॅलरीज कमी असतात.

सोसायटीने पाडला कृत्रिम पाऊस!

दिल्लीतील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस ढासळत आहे. दिल्लीतील प्रदूषण दिवसेंदिवस चिंतेचा विषय बनत चालला आहे. गुरुग्राममधील हवा गुणवत्ता निर्देशांक अत्यंत खराब श्रेणीमध्ये आहे. यामुळे शहरातील एका गृहनिर्माण संकुलाने वायू प्रदूषणाचा सामना करण्यासाठी एक अनोखी पद्धत निवडली आहे. गुरुग्राम सेक्टर ८२ मधील डीएलएफ प्राईमस सोसायटीने धूळ आणि कणांवर नियंत्रण ठेवण्यासाठी अग्निशमन कार्यात मदत वापरण्यास येणारी स्प्रिंकलर आणि पाण्याच्या पाईप्सचा वापर करून 'कृत्रिम पाऊस' पाडला आहे. ३२ मजली उंच असलेल्या टॉवर्समधून कॉम्प्लेक्सवर पाणी पाडलं जात असल्याचा व्हिडीओ समोर आला आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना कॉम्प्लेक्सचे अध्यक्ष अचल यादव यांनी म्हटलं की, रहिवाशांचे आरोग्यासाठी हे उपाय केले गेले आहेत. प्रदूषण केवळ सरकारद्वारे नियंत्रित केले जाऊ शकत नाही. सर्वांनीच हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. यासाठी आवश्यक असल्यास दररोज इथे कृत्रिम पाऊस पाडला जाणार आहे. केवळ सरकारवर अबलंबून न राहता गुरुग्रामच्या प्रत्येक रहिवाशाने यात योगदान दिले पाहिजे. आम्ही आमच्या ३२ मजली इमारतींवरून कृत्रिम पाऊस पाडत आहोत. जेणेकरून किमान धूळ आणि इतर कण, जे लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचे नुकसान पोहोचवू शकतात, यातून दिलासा मिळेल, असं यादव यांनी म्हटलं. प्रदूषण कमी करण्यासाठी क्लाऊड सीडिंगचा प्रयत्न केला जाऊ शकतो. यामध्ये पर्जन्य वाढवण्यासाठी सिल्व्हर आयोडाइड आणि कोरड्या बर्फासारखे पदार्थ वातावरणात पसरवून केले जातात. दिल्लीचे पर्यावरण मंत्री गोपाल राय यांनी या आठवड्यात सांगितले की, 'आप' सरकार वायू प्रदूषणाशी लढण्यासाठी कृत्रिम पावसाचा वापर करण्याचाही विचार करत आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे आदेश; आरक्षण उद्देशाला हरताळ खपवून घेणार नाही

आरक्षणासाठी धर्मांतराला परवानगी नाही

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

• न्यायमूर्ती पंकज मिथल यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने सांगितले, की भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. घटनेच्या अनुच्छेद २५ नुसार, देशातील प्रत्येक नागरिकाला स्वत:च्या इच्छेने कोणताही धर्म निवडण्याचे आणि त्याच्या परंपरांचे पालन करण्याचे स्वातंत्र्य आहे. कोणीतरी त्याचा धर्म बदलतो, जेव्हा तो प्रत्यक्षात दुसऱ्या धर्माच्या तत्त्वांचा आणि परंपरांचा प्रभाव असतो; मात्र केवळ दुसऱ्या धर्मांतर्गत आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी कोणतेही धर्मांतर होत असेल, तर त्याला परवानगी देता येणार नाही. असे करणे म्हणजे आरक्षण धोरणाच्या सामाजिक चिंतेला बगल देणे होय.

नवी दिल्ली : धर्मांतराचा उद्देश केवळ आरक्षणाचा लाभ मिळवणे हा असेल तर त्याला परवानगी देता येणार नाही, कारण त्यामुळे सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समुदायांना आरक्षण देण्याच्या उद्देशालाच हरताळ फासला जाईल,' अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली. तसेच महिलेला फटकारले.

सर्वोच्च न्यायालयाने पुद्दुचेरीतील एका महिलेची याचिका फेटाळली. ती नोकरीमध्ये अनुसूचित जाती अंतर्गत आरक्षणाचा लाभ देण्याची मागणी करत होती. याचिका फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे, की जर कोणी केवळ आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी धर्मांतर करत असेल तर त्याला आरक्षणाच्या नावाखाली त्याचा लाभ घेता येणार नाही. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती पंकज मिथल आणि आर. महादेवन यांच्या खंडपीठाने सांगितले, की जी व्यक्ती नियमितपणे चर्चमध्ये जातो आणि ख्रिश्चन धर्माच्या परंपरेचे पालन करतो तो स्वत:ला हिंदू म्हणवून अनुसूचित जाती अंतर्गत आरक्षणाचा लाभ घेऊ शकत नाही.

नोकरीत अनुसूचित जाती अंतर्गत आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी महिलेने याचिका दाखल केली होती. न्यायालयाने आदेशात म्हटले आहे, की जर धर्मांतराचा उद्देश प्रामुख्याने आरक्षणाचा लाभ मिळवणे हा असेल आणि दुसऱ्या धर्मावर खरा विश्वास नसेल तर त्याला परवानगी दिली जाऊ शकत नाही, कारण अशा गुप्त हेतू असलेल्या लोकांना आरक्षणाचा लाभ नाकारला जाईल. आरक्षण दिल्याने आरक्षण धोरणाचे उल्लंघन होईल. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले, की या प्रकरणात सादर केलेल्या पुराव्यांवरून स्पष्टपणे दिसून येते, की अपीलकर्ता ख्रिस्ती धर्मावर विश्वास ठेवतो आणि नियमितपणे चर्चमध्ये जाऊन त्या विश्वासाचे पालन करतो. असे असूनही, ती हिंदू असल्याचा दावा करते आणि नोकरीच्या उद्देशाने अनुसूचित जाती समाजाचे प्रमाणपत्र मागते. आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी ही दुटप्पी वागणूक योग्य नाही.

» Selected

नदीत ट्रक कोसळून दोन ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

लुधियाना : मुरादाबादजवळील हिंडन नदीच्या पुलावर आज पहाटे एक ट्रक नदीत कोसळून भीषण अपघात झाला. या अपघातात ट्रकमध्ये प्रवास करणाऱ्या दोघांचा मृत्यू झाला, तर अन्य दोघांना पोलिस आणि स्थानिक लोकांनी बचाव मोहिमेद्वारे सुखरूप बाहेर काढले. पोलिस अधिकारी गजेंद्र पाल सिंह यांनी सांगितले, की वीटभट्टीची माती लुधियाना येथून ट्रकमध्ये मुरादाबादला नेली जात होती. हा ट्रक बुढाणा मार्गे मुझफ्फरनगरकडे जात होता. पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास चालकाचे अचानक नियंत्रण सुटले आणि पुलाचे रेलिंग तोडून ट्रक नदीत पडला.

पती ऐकत नसल्याने पत्नीची मुलीसह आत्महत्या

लखनऊ : 'मी मरणार आहे' हे लक्ष्मी बिंदचे शेवटचे शब्द होते. यानंतर लक्ष्मीने तिच्या दोन वर्षांच्या मुलीसह मृत्यूला कवटाळले. हे प्रकरण उत्तर प्रदेशातील भदोही येथील आहे. सुरियावा रेल्वे स्थानकाजवळ एक महिला आणि तिच्या मुलीचा मृतदेह आढळून आला. पतीने सांगितले, की त्याची पत्नी त्याच्यासोबत गुजरातला येण्याचा आग्रह करत होती. पतीने तिचे म्हणणे न ऐकल्याने महिलेने हे संतापजनक पाऊल उचलले. दानुपूर येथील रहिवासी वीरेंद्र बिंद हे गुजरातमध्ये काम करतात, तर त्यांचे कुटुंब भदोही येथे राहते. दिवाळीच्या सुट्टीत तो घरी आला होता. रजा संपल्यानंतर तो गुजरातला जाऊ लागला, तेव्हा लक्ष्मीनेही त्याच्यासोबत जाण्याचा हट्ट धरला; मात्र वीरेंद्रने सांगितले, की तो तिला सध्या सोबत घेऊन जाऊ शकत नाही. त्यातून तिने हे टोकाचे पाऊल उचलले.

लग्नाहून परतताना दुभाजकावर कार धडकली; एक जखमी

अपघातात पाच डॉक्टर ठार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

लखनऊ : उत्तर प्रदेशातील कन्नौजमध्ये सैफई मेडिकल कॉलेजच्या पाच डॉक्टरांचा रस्ता अपघातात मृत्यू झाला. लखनऊ-आग्रा द्रुतगती मार्गावरील तिरवा येथे आज पहाटे साडेतीन वाजता हा अपघात झाला. ताशी शंभर किलोमीटर वेगाने धावणारी स्कॉर्पिओ दुभाजकाला धडकली, दोनदा उलटली आणि दुसऱ्या लेनवर आली. त्यानंतर ट्रकची स्कॉर्पिओला धडक बसली. ही टक्कर इतकी भीषण होती की स्कॉर्पिओ अनेक मीटरपर्यंत खेचली गेली. स्कॉर्पिओमध्ये सहा जण होते. त्यापैकी पाच जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एकाची प्रकृती चिंताजनक आहे.

मृत्यू झालेले सर्व डॉक्टर सैफई मेडिकल कॉलेजमधून पीजी करत होते. मंगळवारी एका लग्नात सहभागी होऊन लखनऊहून परतत होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चालकाच्या झोपेमुळे आणि अतिवेगाने हा अपघात झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. स्कॉर्पिओने आधी दुभाजक तोडले आणि नंतर अनेक चकरा मारून दुसऱ्या लेनवर पोहोचली. त्या लेनमध्ये भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकची स्कॉर्पिओला धडक बसली. अपघाताची माहिती मिळताच डॉक्टरांचे नातेवाइक कन्नौज जिल्हा रुग्णालयात दाखल झाले. धडक इतकी भीषण होती की स्कॉर्पिओचा चक्काचूर झाला. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहन कापून सर्व मृतदेह व जखमीला बाहेर काढले.

नराधमाचे अमानवी कृत्य : २५ दिवसांत चार खून, मृतदेहावर बलात्कार

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

अहमदाबाद : गुजरातमधील वलसाड येथे १४ तारखेला १९ वर्षीय विद्यार्थिनीवर बलात्कार करून तिची हत्या करणारा आरोपी सीरियल किलर असल्याचे समोर आले आहे. या घटनेच्या पहिल्या २५ दिवसांत आणखी चार खुनाच्या गुन्ह्याची कबुली आरोपीने दिली आहे. गुजरात न्यायालयाने आरोपीला पाच दिवसांची कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान आणखी घटना उघडकीस येण्याची शक्यता आहे.

केलावलसाडच्या पारडी तालुक्यातील मोतीवाला परिसरात राहणारी बी.कॉम.च्या दुसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी शिकवणीवरून घरी परतत होती. दरम्यान, निर्जन भागातून जात असताना, आरोपीने तिला झुडपात ओढले. त्याने तिच्यावर बलात्कार करून तिचा गळा दाबून खून केला. एवढेच नाही तर आरोपी दोन तासांनंतर घटनास्थळी परतला. येथे त्याने विद्यार्थिनीच्या मृतदेहावरही दोनदा बलात्कार केला. दरम्यान, काही लोक येण्याचा आवाज ऐकून तो घाईघाईने आपला टी-शर्ट व बॅग मागे टाकून पळून गेला. घटनेच्या दिवशी आरोपी वलसाड रेल्वे स्थानकावर फिरताना दिसला.

या घटनेतील पीडित विद्यार्थिनी रात्री उशिरापर्यंत घरी न परतल्याने कुटुंबीयांनी तिचा शोध सुरू केला. पोलिसांना माहिती देण्यात आली आणि पोलिसांच्या दोन पथकांनीही शोध सुरू केला. सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही विद्यार्थिनी शिकवणीवरून घरी परतताना दिसत होती; मात्र ती मध्येच गायब झाली.त्यामुळे पोलिसांनी रेल्वे रुळाजवळील परिसरात शोध सुरू केला. अखेर रात्री मोतीवाला गेटजवळील झुडपातून तिचा मृतदेह सापडला. शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालात बलात्कार आणि त्यानंतर गळा दाबून खून झाल्याचे उघड झाले होते.

दहा हजारांचे बूट

• आरोपीच्या बोलण्यातून आणि वागण्यावरून तो खूप हिंसक असल्याचे दिसते. आरोपीच्या चौकशीत आणखी काही न उलगडलेले गुन्हे उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. पोलिसांच्या चौकशीत आरोपी चोरी, दरोड्याचे गुन्हे करत असल्याचे उघड झाले. त्याच्यावर विविध राज्यात १३ चोरीचे गुन्हे दाखल आहेत. विशेषत: रात्रीच्या वेळी तो ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मौल्यवान वस्तू चोरायचा, दहा हजारांचे बूट घालायचा. ट्रकमधून तेल चोरणे आणि बेकायदेशीर शस्त्रास्त्रे बाळगल्याप्रकरणी तो राजस्थान, हरियाणा, उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये कारागृहातही राहिला आहे.

अदानींना अटक करण्याची राहुल गांधींची मागणी

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

संविधानावर चर्चेची राहुल यांची मागणी

• लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राज्यघटनेवर दोन दिवस सभागृहात चर्चेची मागणी केली. राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनीही वरच्या सभागृहात हीच मागणी केली आहे. माजी ॲटर्नी जनरल आणि ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांच्या अदानी समूहावरील आरोपांबाबत खर्गे म्हणाले होते, की आम्ही आज नियम २६७ अंतर्गत प्रश्न उपस्थित करत आहोत.

नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजता लोकसभा आणि राज्यसभेचे कामकाज सुरू झाले. या वेळी विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचे कामकाज बुधवारी सुरू झाल्यानंतर काही मिनिटांतच तहकूब करण्यात आले. त्यानंतर राज्यसभेचे कामकाजही थांबवण्यात आले.

सभागृहाचे कामकाज सुरू होताच काँग्रेस सदस्यांनी आपापल्या जागेवर उभे राहून अदानी समूहाशी संबंधित मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. काही सदस्यांनी स्थगन नोटीसचा उल्लेखही ऐकला. समाजवादी पक्षाच्या सदस्यांनी संभाल घटनेवर आवाज उठवण्याचा प्रयत्न केला. विरोधी सदस्यांच्या घोषणाबाजीत लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू केला.

काँग्रेस आणि सपचे अनेक सदस्य सीटजवळ पोहोचले आणि घोषणाबाजी करू लागले.

प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान भारतीय जनता पक्षाचे सदस्य अरुण गोविल यांनी इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाशी संबंधित पूरक प्रश्न विचारले. त्यांना मंत्री अश्विनी वैष्णव यांनी उत्तरे दिली. बिर्ला व्यासपीठाजवळ पोहोचले आणि त्यांनी घोषणाबाजी करणाऱ्या विरोधी सदस्यांना आपापल्या जागी जाण्याचे आवाहन केले आणि प्रश्नोत्तराचा तास सुरू ठेवण्यास संमती दिली. गोविल यांचा उल्लेख करून ते म्हणाले की, ते पहिल्यांदाच प्रश्न विचारत आहेत, त्यामुळे सभागृहाचे कामकाज चालू द्यावे. मात्र, हा गोंधळ थांबला नाही आणि विरोधी सदस्यांची घोषणाबाजी सुरूच होती.

काँग्रेस रस्त्यावर

नवी दिल्ली लाचखोरीचा आरोप असणाऱ्या गौतम अदानी यांना अटक करण्याच्या मागणीसाठी काँग्रेसचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करीत होते.

दंगलखोरांवर कारवाई करण्याचा सरकारचा निर्णय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

लखनऊ : उत्तर प्रदेशातील संभल येथील जामा मशिदीत सर्वेक्षणाबाबत मोठा गदारोळ झाला आणि समाजकंटकांनी मोठा हिंसाचार केला. पोलिसांवर दगडफेक किंवा सरकारी मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांविरोधात योगी सरकार आता कठोर झाले असून, नुकसानीची वसुली दगडफेक करणाऱ्यांकडून करण्यात येईल, असा निर्णय घेण्यात आला आहे.

संभलमधील हिंसाचारात चार जणांचा मृत्यू झाला असून पोलिसांसह अनेक नागरिक जखमी झाले आहेत. हल्लेखोरांनी जोरदार दगडफेक करून वाहने पेटवून दिली. एकीकडे परिस्थिती सामान्य होत आहे, तर दुसरीकडे योगी प्रशासन दगडफेक करणाऱ्यांचा शोध घेत आहे. सार्वजनिक ठिकाणी समाजकंटकांचे मोठे पोस्टर लावले जातील. याशिवाय जे पकडले जाणार नाहीत, त्यांच्यावर बक्षीस जाहीर केले जाईल. योगी प्रशासन संभल हिंसाचार प्रकरणातील आरोपींना अजिबात सोडणार नसल्याचे हे स्पष्ट संकेत आहे. सरकारने दंगली आणि हिंसाचाराच्या प्रकरणी नुकसान भरपाई करण्यासाठी अध्यादेश जारी केला आहे.

संभलच्या शाही जामा मशिदीचे सर्वेक्षण करण्याचे आदेश नुकतेच न्यायालयाने दिले होते. सर्वेक्षण करण्यासाठी पथक आले असता हिंसाचार उसळला. यामध्ये लोकांनी प्रचंड गोंधळ निर्माण केला. संभस हा समाजवादी पक्षाचा बालेकिल्ला मानला जातो. या आरोपींनी पोलिसांवर दगडफेक करून सरकारी मालमत्तेचेही नुकसान केले.

इम्रान समर्थकांचे आंदोलन चौथ्या दिवशी मागे

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

इस्लामाबाद : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांचा पक्ष पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) ने बुधवारी आपले आंदोलन मागे घेतले.

'पीटीआय'ने म्हटले आहे, की पाकिस्तानच्या शाहबाज शरीफ सरकारने निरपराध नागरिकांचे रक्त सांडण्याची योजना आखली आहे. हे पाहता 'पीटीआय'ने आंदोलन संपवण्याचा निर्णय घेतला आहे. तीन दिवसांपूर्वी इम्रान खान यांच्या सुटकेसाठी निदर्शने सुरू झाली; पण पाकिस्तानी लष्कराच्या कारवाईमुळे 'पीटीआय'ने आंदोलन गुंडाळले. इम्रान खान यांची पत्नी बुशरा बीबी आणि खैबर पख्तुनख्वाचे मुख्यमंत्री अली अमीन गंडापूरमधून पळून गेले.'पीटीआय'च्या मीडिया सेलने बुधवारी एक निवेदन जारी केले. निवेदनात, 'पीटीआय'ने म्हटले आहे, की सरकारची क्रूरता आणि संघीय राजधानीला निशस्त्र नागरिकांसाठी कत्तलखान्यात रूपांतरित करण्याची योजना पाहता, आम्ही आमचे शांततापूर्ण आंदोलन तात्पुरते स्थगित करत आहोत. इम्रान खान यांच्या नेतृत्वाखाली पुढील आँदोलनाची घोषणा करेल. पक्षाच्या राजकीय आणि कोअर कमिटी निदर्शनांदरम्यान नागरिकांवर सरकारच्या क्रूरतेच्या तपशीलांचे विश्लेषण करतील आणि त्याचे निष्कर्ष इम्रानला देतील.

लष्करी छावणीतील तरुण झाला बेपत्ता

सुरक्षा यंत्रणांची वाढली चिंता; शाळा, महाविद्यालये बंद

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

इंफाळ : मणिपूरमधील तणाव कमी होण्याची चिन्हे नाहीत. हिंसाचारामुळे सरकारने शाळा आणि महाविद्यालये अनिश्चित काळासाठी बंद केली आहेत. दरम्यान, एका घटनेने सुरक्षा यंत्रणा पुन्हा एकदा चिंतेत आहेत. येथील लष्करी छावणीत काम करणारा तरुण बेपत्ता झाला असून, त्याच्या शोधासाठी शोधमोहीम सुरू आहे. येथे ड्रोन, ट्रॅकर आणि श्वान पथकाच्या मदतीने पथक तरुणाचा शोध घेत आहे.

संरक्षण अधिकाऱ्यांनी सांगितले, की आसामच्या कचार जिल्ह्यातील मूळ रहिवासी लैश्राम कमलबाबू सिंग सोमवारी दुपारी कांगपोकपी येथील लीमाखाँग मिलिटरी स्टेशनवर कामासाठी जाण्यासाठी घरातून निघाले होते, तेव्हापासून तो बेपत्ता आहे. त्यांच्या कुटुंबीयांशी चर्चा केली, तेव्हा सिंग २५ नोव्हेंबरच्या संध्याकाळी घरी परतले नाहीत. कुटुंबीयांकडून माहिती मिळाल्यानंतर लष्कर तातडीने कारवाईत आले. या तरुणाबाबत कोणतीही माहिती उपलब्ध नाही. लष्करी अधिकाऱ्यांनी सांगितले, की सीसीटीव्ही फीड स्कॅन केले जात आहे. ट्रॅकर आणि श्वान पथकाच्या मदतीने शोध घेतला जात आहे. शोध घेतल्यानंतरही या तरुणाचे वाहन किंवा त्याची कोणतीही माहिती मिळू शकलेली नाही.

लष्कराच्या अधिकाऱ्यांनी बेपत्ता व्यक्तीचा शोध घेण्यासाठी त्या भागातील 'सीएसओ'शीही बोलणे केले आहे. सिंग यांच्या कुटुंबात लवकर आणि सुरक्षित परतण्यासाठी काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

अतिरेक्यांनी पळवल्याचा संशय

• आर्मी कॅम्प शहरापासून लांब आहे. हा भाग कुकी लोक राहत असलेल्या टेकड्यांनी वेढलेला आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात वांशिक हिंसाचार सुरू झाल्यानंतर लिमाखोंगजवळ राहणारे मैतेई समुदायाचे लोक तेथून पळून गेले. या हिंसाचारात आता २५० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे. मैतेई समाजाच्या या तरुणाला कुकी अतिरेक्यांनी पळवल्याचा आरोप आहे.

विमा क्षेत्रात शंभर टक्के परकीय गुंतवणूक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : संसदेच्या चालू अधिवेशनात विमा कायद्यात महत्त्वाचे बदल करण्याचा सरकारचा विचार आहे. यामध्ये युनिफाइड परवाना आणि विमा क्षेत्रातील थेट विदेशी गुंतवणुकीची (एफडीआय) मर्यादा ७४ टक्क्यांवरून शंभर टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव आहे.

युनिफाइड लायसन्स हा एक संमिश्र परवाना आहे, जो विमा कंपन्यांना एकाच प्लॅटफॉर्मवर जीवन, सामान्य आणि आरोग्य विमा उत्पादने ऑफर करण्यास अनुमती देईल. सध्या जीवन विमा कंपन्या हेल्थ कव्हर सारखी उत्पादने विकू शकत नाहीत, तर सामान्य विमा कंपन्यांना आरोग्य आणि सागरी विमा विकण्याची परवानगी आहे. नवीन परवान्यामुळे ही गुंतागुंत दूर होणार आहे.

विमा क्षेत्रातील एफडीआय मर्यादा शंभर टक्क्यांपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट अधिक विदेशी गुंतवणूक आकर्षित करणे आणि देशात विमा उत्पादनांचा प्रवेश वाढवणे हा आहे. स्विस री इन्स्टिट्यूटच्या मते, सध्या भारतात विमा प्रवेश केवळ ३.८ टक्के इतका आहे. या बदलांमुळे अधिकाधिक ग्राहकांपर्यंत विमा उत्पादने पोहोचवणे शक्य होणार आहे. विमा उद्योगाला मोठ्या भांडवलाची गरज असते. सरकारला शंभर टक्के परकीय गुंतवणुकीला परवानगी देऊन प्रचंड भांडवल असलेल्या विदेशी कंपन्यांना आकर्षित करायचे आहे. या धोरणामुळे एसबीआय, एचडीएफसी, आयसीआयसीआय, टाटा आणि बिर्ला यांसारख्या देशांतर्गत दिग्गजांसाठी स्पर्धा वाढेल.

काय बदलणार?

- विमा कंपन्यांना अधिक वैविध्यपूर्ण उत्पादने देण्याचे स्वातंत्र्य
- विमा क्षेत्रातील गुंतवणूक वाढणार. रोजगाराच्या अधिक संधी
- परवाना प्रक्रिया सुलभ
- नवीन कंपन्यांचा प्रवेश सोपा

वैभवने ट्रायल्समध्ये छाप पाडली होती. त्याच्याकडे चांगले कौशल्य आहे. त्यामुळे आम्ही विचार केला की त्याला इथे आणखी सुधारणा करण्याची संधी मिळेल.
— राहुल द्रविड

'गुडबाय कधीच सोपं नसतं. दिल्ली कॅपिटल्ससोबतचा प्रवास हा स्वप्नवत होता. मी इथे युवा खेळाडू म्हणून आलो होतो आणि मागील ९ वर्षांत एक चांगला खेळाडू म्हणून घडलो. चाहत्यांनी हा प्रवास आणखी अविस्मरणीय केला. तुम्ही माझ्यासाठी चिअर केलेत, मला प्रोत्साहन दिले, तुमचे आभार...
— ऋषभ पंत

आयसीसी कसोटी क्रमवारी : जैस्वाल-विराट यांचीही भरारी

बुमराह पुन्हा नंबर वन

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क



नवी दिल्ली : भारतीय संघाने २५ नोव्हेंबर रोजी ऑस्ट्रेलियाला पर्थ कसोटीत २९५ धावांनी पराभवाचा धक्का दिला आणि ऑस्ट्रेलियामधील धावांच्या तुलनेतील सर्वात मोठ्या विजयाची नोंद केली. भारताच्या या विजयात कर्णधार जसप्रीत बुमराह, विराट कोहली, यशस्वी जैस्वाल, मोहम्मद सिराज यांनी मोलाचा वाटा उचलला होता. आता याचे बक्षीस त्यांना आयसीसीच्या कसोटी क्रमावारीत मिळाले आहे. आयसीसीने मंगळवारी (२७ नोव्हेंबर) ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे.

या कसोटी क्रमवारीत गोलंदाजांच्या यादीत जसप्रीत बुमराहने पुन्हा अव्वल क्रमांकावर कब्जा केला आहे. त्याने पर्थ कसोटीत ८ विकेट्स घेतल्या होत्या. तो सामनावीरही ठरला होता. त्यामुळे आता तो पुन्हा दोन स्थानांची प्रगती करत अव्वल क्रमांकावर आला आहे.

त्याने दक्षिण आफ्रिकेच्या कागिसो रबाडा आणि ऑस्ट्रेलियाच्या जोश हेजलवूड यांना मागे टाकले आहे. याशिवाय बुमराहने कारकिर्दीतील सर्वोत्तम रेटिंग पॉइंट्सही मिळवले आहेत. तो ८८३ पॉइंट्ससह अव्वल क्रमांकावर आहे.

दुसऱ्या क्रमांकावर ८७२ पॉइंट्ससह रबाडा आहे, तर तिसऱ्या क्रमांकावर हेजलवूड असून त्याचे ८६० पॉइंट्स आहेत. भारताचा आर अश्विन ८०७ पॉइंट्ससह चौथ्या क्रमांकावर असून श्रीलंकाचा प्रभाथ जयसूर्या ८०१ पॉइंट्सह पाचव्या क्रमांकावर आहे.

ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सला मात्र नुकसान झाले असून तो २ स्थानांनी घसरून सहव्या क्रमांकावर आला आहे. त्याचे ७९६ पॉइंट्स आहेत. त्याच्यापाठोपाठ भारताचा रविंद्र जडेजा आहे. त्याचे ७९४ पॉइंट्स आहेत. ऑस्ट्रेलियाचा नॅथन लायनलही एका स्थानाने घसरला असून तो ७८२ पॉइंट्ससह ८ व्या क्रमांकावर आहे. पर्थ कसोटीत सिराजनेही ५ विकेट्स घेतल्या होत्या. त्यामुळे तो ३ स्थानांची प्रगती करत २५ व्या क्रमांकावर आला आहे.

पर्थ कसोटीत जैस्वालने दुसऱ्या डावात १६१ धावांची खेळी केली होती, तर विराटनेही १०० धावांची नाबाद खेळी केली होती. त्यामुळे त्यांनाही फायदा झाला आहे. जैस्वाल दोन स्थानांनी वर चढून दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. त्याने केन विलियम्सन आणि हॅरी ब्रुक यांना मागे टाकले आहे.

फादर शॉच मेमोरियल हॉकी स्पर्धा

कर्नल भगत इंग्लिश स्कूलची धडाकेबाज सुरुवात

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : कर्नल भगत इंग्लिश स्कूलने मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर, पिंपरी येथे मंगळवारपासून सुरू झालेल्या प्रतिष्ठेच्या फादर मेमोरियल हॉकी स्पर्धेत धडाकेबाज सुरुवात करताना सलामीला रामचंद्र गायकवाड हायस्कूलचा १०-० असा धुव्वा उडवला.

लोयोला हायस्कूलने इलनसह (ELAN -Ex-Loyola Alumni Network) सलग पाचव्या वर्षी आयोजित केलेली ही स्पर्धा केवळ शालेय मुलांसाठी आहे.

कर्नल भगत हायस्कूलचा मोठा विजय हे पहिल्या दिवसाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. फैजल शेखने (१५वे, १६वे, ५५वे) तीन गोल करून कादर खानने दोन (२५वे - पीसी, ४६वे) तसेच अभिषेक कुमार (दुसरे - पीसी); शाहिद शेख (तिसरे); नुमैर शेख ३० वा; अरबाज खान (३२वे) आणि मारुफ खानने (५१वे - पीसी) प्रत्येकी एक गोल करताना विजयात मोलाचा वाटा उचलला.

१९ वर्षांखालील मुलींच्या गटात खडकी एज्युकेशन सोसायटी आणि लोकमान्य टिळक हायस्कूलने अनुक्रमे न्यू मिलेनियम आणि अँग्लो उर्दू हायस्कूलविरुद्ध (आबेदा इनामदार) विजय मिळवला.

खडकी एज्युकेशन सोसायटीने सिद्धी गवळी (१४वा, ५९वा), सपना वडार (१६वा) आणि शेह बेंद्रेच्या (४५वा) गोलच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर ४-० अशा फरकाने मात केली.

थात्तू, पत्रावाला, दानोले, परीट, सोनावने यांना सुवर्णपदक

पुणे : सायकलिंग असोसिएशन ऑफ अहमदनर डिस्ट्रीक्ट आयोजित ५व्या महाराष्ट्र राज्य रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेत आज आंतरराष्ट्रीय खेळाडू सुर्या थात्तू (पुणे), मुस्तफा पत्रावाला (ठाणे), पूजा दानोले (कोल्हापूर), श्रावणी परीट (पुणे), मोक्ष सोनावने (नासीक), दानीश जमादार (नासीक), गायत्री तांबवेकर (पुणे) यांनी आपापल्या वयोटात सुवर्णपदक विजेती कामगिरी केली. अहिल्यानगर येथे सुरु झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत १९९ सायकलपटूंनी सहभाग घेतला. चाँदबीबी महाल बायपास मार्गावर विवध नऊ वयोगटात स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेचा उदघाटन समारंभ अहिल्यानगरचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहमदनर सायकलिंग क्लबचे सर्वेसर्वा गौरव फिरोदीया यांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी सायकलिंग फेडरेशन आफ इडीयाचे उपाध्यक्ष प्रताप जाधव, स्पर्धेचे मुख्य पंच आणि सीएफआयचे निरीक्षक सुदाम रोकडे, मिहीर तिवारी, मुख्य तांत्रिक प्रमुख दिपाली पाटील, शिवछत्रपती प्ररितोषीक सन्मानीत मिनाक्षी शिंदे, मिनाक्षी ठाकूर आदी मान्यवर हजर होते.



कॅप्टन श्रेयस अय्यर-ऋतुराज गायकवाड येणार आमने-सामने

नवी दिल्ली : सय्यद मुश्ताक अली टी-२० करंडक सध्या सुरू असून मंगळवारी या स्पर्धेतील तिसरी फेरी खेळली जाणार आहे. ग्रुप ईमध्ये मुंबई आणि महाराष्ट्र संघही असून त्यांच्यात तिसऱ्या फेरीत सामना होणार आहे. हा सामना हैदराबादमधील राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर होणार आहे. हे दोन्ही संघ ई गटामध्ये असून कर्णधार ऋतुराज गायकवाडच्या नेतृत्वात खेळणाऱ्या महाराष्ट्र संघाने आतापर्यंत झालेल्या दोन्ही लढतींमध्ये विजय मिळवले आहेत. महाराष्ट्राने पहिल्या फेरीत नागालँडला ६ विकेट्सने पराभूत केले आहे. तसेच दुसऱ्या फेरीत केरळला ४ विकेट्सने पराभूत केले आहे. आत्तापर्यंत अर्शिन कुलकर्णी, अंकित बावणे, राहुल त्रिपाठी, मुकेश चौधरी, दिव्यांग हिंगणेकर हे महाराष्ट्रासाठी चमकले आहेत. तसेच मुंबईने आतापर्यंत झालेल्या एकमेव सामन्यात यश संपादन केले आहे. कर्णधार श्रेयस अय्यरने सलामीच्या लढतीत १३० धावांची आक्रमक खेळी साकारत मुंबई संघाला गोवा संघावर विजय मिळवून दिला होता.

विजय क्रिकेट, टेंभेकर फार्म्स संघांचे विजय

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : स्पोर्टसफिल्ड मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'स्पोर्टसफिल्ड अजिंक्यपद करंडक' १७ वर्षाखालील आंतरक्लब एक-दिवसीय क्रिकेट स्पर्धेत विजय क्रिकेट अॅकॅडमी आणि टेंभेकर फार्म्स अॅकॅडमी या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा मोठ्या धावसंख्यांनी पराभव करून स्पर्धेत दमदार विजय मिळवले.

मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीच्या मैदानावर झालेल्या स्पर्धेत शिवम गोरे याने फटकावलेल्या नाबाद १०३ धावांच्या जोरावर विजय क्रिकेट अॅकॅडमीने क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीचा १९८ धावांनी सहज पराभव केला. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या विजय क्रिकेट अॅकॅडमीने ४६ षटकामध्ये २९९ धावांचा डोंगर उभा केला. यामध्ये शिवम गोरे याने नाबाद १०३ धावांची तर, प्रेम ईघे याने ७२ धावांची खेळी केली. या लक्ष्याचा पाठलाग करताना क्रिकेट नेक्स्ट अॅकॅडमीचा डाव १०१ धावांवर मर्यादितर राहीला. फलंदाजीनंतर गोलंदाजीमध्येही कमाल दाखवताना शिवम याने ४ धावात ४ गडी टिपले.

अंडर- १३ क्रिकेट स्पर्धेत डीव्हीसीए, एसएसए संघांचे विजय

पुणे : लायन्स क्लब पुणे रहाटणी च्या वतीने आयोजित लायन्स ज्युनियर लीग १३ वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत डीव्हीसीए, एसएसए या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा पराभव करून आगेकूच केली.

फोर स्टार मैदान हिंजवडी येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत श्रेयस राठोड (७५ धावा व १-११) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर डीव्हीसीए संघाने एस बी क्रिकेट अकादमी संघाचा १६०धावांनी पराभव केला.

डॉ. प्रमोद मुळ्ये स्मृती प्रौढ मानांकन राज्य टेबल टेनिस स्पर्धा

अजेय यांना विजेतेपदाचा मान

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : अजय कोठावळे या सहाव्या मानांकित खेळाडूंनी अंतिम फेरीत मुंबई उपनगर जिल्हा संघाच्या कपिल कुमार यांचा पराभव केला आणि डॉ .प्रमोद मुळ्ये स्मृती प्रौढ मानांकन राज्य टेबल टेनिस स्पर्धेतील ५९ वर्षावरील गटात विजेतेपद पटकाविले. महाराष्ट्र राज्य प्रौढ टेबल टेनिस संघटनेच्या मान्यतेने ही स्पर्धा पीवायसी जिमखाना यांनी आयोजित केली होती. कोठावळे यांनी अंतिम सामन्यात कपिल कुमार यांच्यावर १३-११, ११-९,११-९ असा सरळ तीन गेम्स मध्ये विजय मिळविला. उपांत्य फेरीत त्यांनी पुण्याच्याच पराग जुवेकर यांचे आव्हान ३-० असे संपुष्टात आणले होते तर कपिल कुमार यांनी विदुर पेंढारकर यांच्यावर ३-० असा विजय मिळवला होता.

स्पर्धेतील ६४ वर्षांवरील गटात मुंबई महानगर जिल्हा संघाचे तृतीय मानांकित खेळाडू प्रकाश पंजाबी विजेते ठरले त्यांनी अंतिम सामन्यात आपले सहकारी व अग्रमानांकित खेळाडू जयंत कुलकर्णी यांना पराभूत करीत आश्चर्याचा धक्का दिला. चुरशीने झालेला हा सामना त्यांनी १३-११,११-६,१०-१२, १०-१२,११-४ असा जिंकला. उपांत्य फेरीत त्यांनी हरीश साळवी या पुण्याच्या खेळाडूंना ३-० असे हरविले होते तर कुलकर्णी यांनी अविनाश जोशी यांचे आव्हान ३-० असे संपुष्टात आणले होते. पुरुषांच्या ४९ वर्षावरील गटात मुंबई उपनगर संघाचे अमित श्रॉफ यांनी विजेतेपद मिळवताना अग्रमानांकित खेळाडू प्रसाद नाईक (मुंबई महानगर जिल्हा संघ) यांच्यावर मात केली हा सामना त्यांनी ९-११,११-८, १२-१०, ११-८ असा जिंकला.

अकोल्याचे पोट्टे गाजवणार आयपीएल! दोण जणांची निवड

नवी दिल्ली : आयपीएल २०२५ च्या लिलावात विदर्भातील खेळाडूंनी एक मोठा ठसा उमठवला आहे. जेद्दाह (सौदी अरेबिया) येथे पार पडलेल्या आयपीएल २०२५ लिलावात विदर्भातील खेळाडूंवर मोठी बोली लागली आहे. विशेषतः, अकोल्याच्या दोन क्रिकेटपटूंनी, दर्शन नळकांडे आणि अथर्व तायडे यांना यश मिळालं आहे. तर अमरावतीच्या जितेश शर्माला देखील चक्क ११ कोटी रुपयात आरसीबीने खरेदी केले आहे. लिलावाच्या पहिल्या दिवशी विदर्भाच्या यष्टीरक्षक फलंदाज जितेश शर्मा याला रॉयल चॅलेंजर्स बंगळूर संघाने ११ कोटी रुपयांची बोली लावून आपल्या संघात घेतले. जितेश शर्मा हा विदर्भ क्रिकेट संघाचा एक महत्वाचा सदस्य आहे आणि त्याने आपले खेळाचे कौशल्य अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सिद्ध केले आहे. याचा प्रमाण ठरला आयपीएल २०२५ मध्ये त्याला मिळालेल्या मोठ्या बोलीतून दिसून आले. दर्शन नळकांडे आणि अथर्व तायडे हे दोघेही विदर्भाच्या अकोला येथून आहेत. या दोन्ही खेळाडूंना आयपीएल २०२५ मध्ये संधी मिळाल्यानंतर त्यांचे कुटुंब आणि अकोला शहर आनंदीत झाले आहेत.

रोहन क्रिकेट क्लब ब संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

पुणे : बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक १५ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत रोहन क्रिकेट क्लब ब संघाने सलग तीन विजयासह उपांत्य फेरीत प्रवेश केला.

आंबेगाव येथील क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत अथर्व भारती (६-६ व नाबाद २०) याने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर रोहन क्रिकेट क्लब ब संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी क संघाचा ८ गडी राखून पराभव करत विजयी मालिका कायम ठेवली.

दुसऱ्या सामन्यात भाव्या ओसवाल (२-१ व ५९ धावा) याने केलेल्या सुरेख खेळीच्या जोरावर बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी ड संघाने रोहन क्रिकेट क्लब अ संघाचा ९ गडी राखून पराभव करत पहिला विजय नोंदवला.

नाशिकचा रामकृष्ण; धोनीच्या ताफ्यात

नवी दिल्ली : इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेसाठी मेगा लिलाव २४ आणि २५ नोव्हेंबर दरम्यान सौदी अरेबियातील जेद्दाह येथे पार पडला. या लिलावात अनेक युवा खेळाडूंना फ्रँचायझींनी आपल्या संघात घेतलं.

यामध्ये राहुल त्रिपाठी, मुकेश चौधरी, रामकृष्ण घोष, राजवर्धन हंगारगेकर आणि अर्शिन कुलकर्णी यांचा समावेश आहे. राहुल, राजवर्धन, मुकेश यांना आयपीएल खेळण्याचा अनुभव आहे. तसेच अर्शिनने १९ वर्षाखालील भारतीय संघाकडून आपली प्रतिभा दाखवलेली आहे. मात्र या सर्वांमध्ये रामकृष्ण घोष हे नाव अनेक क्रिकेटप्रेमींसाठी नवं आहे.

'ट्रोलिंग'चा त्रास होतो ! अनसोल्ड राहिल्यानंतर पृथ्वी शॉ भावनिक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : भारताचा युवा स्टार, ज्याची खेळण्याची शैली चाहत्यांना सचिन तेंडुलकर, वीरेंद्र सेहवाग यांची आठवण करून द्यायची, तो पृथ्वी शॉ इंडियन प्रीमिअर लीग २०२५ च्या मेगा ऑक्शनमध्ये Unsold राहिला. पृथ्वा शॉ मागील काही काळापासून क्रिकेटच्या मैदानावरील कामगिरीपेक्षा वेगळ्याच गोष्टींमुळे चर्चेत राहिला आहे. कधी मुंबईच्या रस्त्यांवर राडा, संघातील बेशिस्तपणा, सरावाला दांडी अशा अनेक कारणांनी पृथ्वीचे नाव खराब झाले आहे. त्यामुळेच त्याला आयपीएल फ्रँचायझींनी खरेदी करण्यास रस दाखवला नसावा, असा कयास बांधला जात आहे.

२५ वर्षीय फलंदाजाचा एक व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. आयपीएल मेगा ऑक्शनमध्ये ७५ लाख बेस प्राईज ठेवूनही पृथ्वीवर कोणीच बोली लावली नाही.

मागील पर्वात तो दिल्ली कॅपिटल्सकडून खेळला होता, परंतु त्याला पुरेशी संधी दिली गेली नव्हती. व्हायरल व्हिडीओत पृथ्वी त्याला केल्या जाणाऱ्या ट्रोलिंगवर भाष्य करतोय. तो म्हणाला, फॉलो न करणारी व्यक्ती मला कशी ट्रोल करू शकते? याचाच अर्थ त्यांचे माझ्यावर लक्ष आहे. ट्रोलिंग ही इतकीपण वाईट गोष्ट नाही, परंतु चांगलीही नाही.

पंतच्या IPL कमाईतून मोदी सरकार टॅक्स वसूल करणार

नवी दिल्ली : इंडियन प्रीमिअर लीग २०२५ चे मेगा ऑक्शन नुकतेच पार पडले आणि त्यात लखनौ सुपर जायंट्सने ऋषभ पंत याच्यासाठी २७ कोटींची बोली लावली. ऋषभ हा आयपीएल इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू ठरला. याच मेगा ऑक्शनमध्ये पंजाब किंग्सने श्रेयस अय्यरसाठी २६.७५ कोटी रुपयांची बोली लावली होती.पण, काही क्षणातच श्रेयसचा महागड्या खेळाडूचा मान ऋषभला मिळाला. इंडियन प्रीमिअर लीगच्या या मेगा लिलावात १८२ खेळाडूंसाठी ६३९.१५ कोटी रुपये खर्च केले गेले. ऋषभसाठी २७ कोटींची बोली लागली असली तरी त्याच्यावरही कर कपातीची काञी चालणार आहे. ऋषभ पंतसाठी दिल्ली कॅपिटल्सने २०.७५ कोटी रुपयांमध्ये राईट टू मॅच कार्ड वापरून स्टार खेळाडू आपल्याकडे कायम ठेवण्याचा प्रयत्न केला. पण, LSG च्या २७ कोटी रुपयांच्या बोलीमुळे दिल्ली कॅपिटल्सला माघार घ्यावी लागली आणि पंत लखनौवासी झाला.२०२२ मध्ये जवळच्या जीवघेण्या कार अपघातातून वाचल्यानंत ऋषभने दमदार पुनरागमन केले.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने 'हायब्रीड मॉडेल' नाकारले, आयसीसीची शुक्रवारी बैठक

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

दुबई : पाकिस्तानमध्ये नियोजित असलेल्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेचे वेळापत्रक निश्चित करण्यासाठी आयसीसीच्या प्रमुख सदस्यांची ऑनलाइन बैठक शुक्रवारी (ता. २९) होत आहे. ही स्पर्धा फेब्रुवारी-मार्च महिन्यात अपेक्षित आहे. पाकिस्तानने हायब्रिड मॉडेलचा प्रस्ताव फेटाळला असल्याचे वृत्त समोर येत आहे. त्यामुळे आता शुक्रवारी होणाऱ्या बैठकीत काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानमध्ये आम्ही खेळणार नाही, अशी स्पष्ट भूमिका भारतीय क्रिकेट मंडळाने जाहीर केलेली आहे.

अंतिम सामन्यात आम्ही प्रवेश केला तर या सामन्यासह आमचे सर्व साखळी सामने इतर देशात (दुबई) खेळवावे, यासाठी ही स्पर्धा हायब्रिड मॉडेलनुसार खेळवावी, अशी बीसीसीआयची मागणी आहे तर पूर्ण स्पर्धा पाकिस्तानमध्येच होईल, अशी ताठर भूमिका पाकिस्तान क्रिकेट मंडळाने घेतलेली आहे, त्यामुळे स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर होणे लांबलेले आहे.

चॅम्पियन्स स्पर्धेच्या नियोजनाचा पेच सोडवण्यासाठी आणि वेळापत्रकावर चर्चा करण्यासाठी आयसीसीची बोर्ड मीटिंग २९ तारखेला ऑनलाइन होणार आहे, असे आयसीसीच्या प्रवक्त्याने सांगितले.

ऋषभ पंतचा विक्रम मोडला; आयपीएलमध्ये नाही लावली कोणत्याही टीमने बोली

उर्विल पटेलच्या १९ चेंडूत १०० धावा !

■ पंढरी संचार न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : गुजरात संघाच्या उर्विल पटेलने सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत बुधवारी विक्रमाला गवसणी घातली. ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये सर्वात जलद शतक झळकावण्याचा विक्रम त्याने नावावर केला. उजव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या उर्विलने त्रिपुराच्या गोलंदाजांची धुलाई करताना २८ चेंडूंत शतक पूर्ण केले. इंडियन प्रीमिअर लीगमध्ये ३० लाखांची बेस प्राईज असलेल्या या खेळाडूवर एकाही फ्रँचायझीने बोली लावली नव्हती. याच आयपीएल लिलावात सर्वाधिक २७ कोटी घेणाऱ्या ऋषभ पंतचा वेगवान ट्वेंटी-२० शतकाचा विक्रम उर्विलने मोडला.

लखनौ सुपर जायंट्सकडून आयपीएल २०२५ मध्ये खेळणाऱ्या ऋषभने २०१८ मध्ये दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर हिमाचल प्रदेशविरुद्ध दिल्लीसाठी ३० चेंडूंत शतक झळकावले होते. भारतीयाने झळकावलेले ते वेगवान शतक ठरले होते. तो विक्रम आज उर्विलने मोडला.

उर्विलचे हे शतक जगातील दुसरे वेगवान शतक ठरले. इस्तोनियाच्या साहिल चौहान याने याचवर्षी सायप्रस संघाविरुद्ध २७ चेंडूंत तिहेरी आकडा गाठला होता. उर्विलनच्या नावावर लिस्ट ए क्रिकेटमधील दुसऱ्या वेगवान शतकाचा विक्रम आहे. त्याने नोव्हेंबर २०२३ मध्ये अरुणाचल प्रदेश संघाविरुद्ध ४१ चेंडूंत १०० धावा कुटल्या होत्या. आयपीएलच्या मागील पर्वात उर्विल गुजरात टायटन्सचा सदस्य होता आणि त्याला यावेळी रिलीज केले गेले.

सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीत त्रिपुराने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद १५५ धावा उभ्या केल्या. त्यांच्याकडून श्रीदम पॉल (५७) आणि एस शरथ (२९) यांनी दमदार खेळ केला. प्रत्युत्तरात आर्या देसाईने ३८ धावांची खेळी केली.